
# ख्रिस्तायन

## ई-अंक ख्रिसमस २५ डिसेंबर २०१२



# ख्रिस्तायन


## नाताळ ई-अंक     वर्ष पाचवे

## २५ डिसेंबर २०१२

**संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो**



**संपादन साहाय्य**

स्वप्निल रिबेलो

स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

अंक सजावट

**राजन जेरोम डिमेलो**

अंक मांडणी व तांत्रिक सहकार्य

**वनवसई टिम**



© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन



**संपर्क / अभिप्राय**

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा

ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com (9819436078)

१वसई :- admin@onevasai.com



**आभार**

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही


## अनुक्रमणिका :-


संपादकीय

कृतिशील समाजचिंतक फा. दिब्रिटो – संग्राहय

चंगळवादात वैचारीक उत्सवाचा मांडव – फेलिक्स डिसोजा

निसर्गशास्त्र नीतिशास्त्रा पेक्षा श्रेष्ठ – सचिन मेंडिस

लग्नाआ बजेट - सायमन रॉड्रिग्ज

एक अनावृत पत्र - जेम्सन डिमेलो

माय लव, माय लाईफ, प्रकरण ११ - केविन आल्मेडा

लोकसंगीत – लोकगीते - मेलविन डाबरे

एक अनुभव - ख्रिस्तोफर रिबेलो

**कविता / चारोळया :-**

इग्नेशियस डायस

सबिना फोस

एडवर्ड डिसोजा

राजन डिमेलो

जॉनसन लोपीस

**चित्रे :-**

रॉबर्ट परेरा

पॉल डिमेलो

स्टिवन आल्मेडा

# संपादकीय

आजपर्यंत असे दिसून आले आहे की आपल्या वसईतील ख्रिस्ती समाजाला एवढा मोठा साहित्यिक वारसा असताना आपण मात्र तसे या साहित्यिक मेजवानीपासून दूरच आहोत. आतापर्यंत आपल्या परिसरात प्रसिद्ध होत असलेल्या मासिक-पाक्षिक यांचे नाताळ सणानिमित्ताने फक्त विशेषांक प्रकाशित होत असतात परंतु पुर्णपणे नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा “ख्रिस्तायन” हा पहिला प्रिंट व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे. जसे दिवाळी सणावेळी आपले हिंदू बांधव दिवाळी अंक प्रकाशित करतात. आम्हालाही आपल्या मराठी भाषिक समाजात अश्या प्रकारची (नाताळ अंक प्रकाशित करण्याची) चळवळ पुढे न्यायची आहे. प्रिंट काढणे ही खर्चिक बाब आहे तसेच वितरण व्यवस्था उभारणे कठीण आहे, त्यामुळे सध्याचे संपर्काचे साधन इंटरनेट वापरुन हा प्रयत्न आम्ही गेल्या वर्षीपासून करत आहोत. पुढच्या वर्षी जर असाच एखादा अथवा काही नाताळ अंक प्रकाशित झाले तर आम्हाला सगळ्यात जास्त आनंद होईल..

त्याचप्रमाणे ह्या वेळचा अंक हा प्रामुख्याने वसईतील नव कवि-लेखकांच्या साहित्यकृतींनी तसेच प्रतिभावंत चित्रकारांच्या चित्रांनी सजलेला असा आहे, आपणाला जरूर तो आवडेल अशी आशा आहे.

यापुढेही प्रत्येक नाताळ सणावेळी असाच साहित्यिक फराळ आपणासाठी पेश करायला आम्हाला आवडेल. आपल्या सहकार्याची आणि प्रतिक्रियांची आम्हाला अपेक्षा आहेत.

नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!

Merry Christmas & Happy New Year.

**वसईचे नाव साहित्यिक क्षेत्रात सर्वदूर पसरविणारे फादर फ्रान्सिस दिब्रिटो हे वसईचे भूषण आहेत, आमच्या सारख्या साहित्यिक आणि सामाजिक चळवळीत चंचु प्रवेश करू इच्छिणाऱ्या अनेकांचे प्रेरणास्थान, वसईच्या इतिहासात त्यांचे नाव नक्कीच फार वरचे आहे, 23 डिसेंबर रोजी त्यांनी आपल्या धर्मगुरू पदाची 40 वर्षे पूर्ण केली आहेत, त्यांच्याविषयी इंटरनेट वर काय आहे असे सहज कुतूहल म्हणून "सर्च" केले असता त्यांच्याविषयीचा जेष्ठ साहित्यिक प्रा. सिसिलिया कर्व्हालो यांचा हा लेख गवसला, फादरांना पुढील कार्यासाठी अनेक सुभेच्छा – संपादक**

# कृतिशील समाजचिंतक: फादर दिब्रिटो

फादर दिब्रिटो हे कॅथलिक पंथीय ख्रिस्ती धर्मगुरू आहेत. त्यांचा जन्म वसईतील मराठी भाषिक ख्रिस्ती कुटुंबातील. विरार-आगाशी परिसरातील नंदाखाल हे त्यांचे जन्मगाव. मराठी साहित्यातील एक सिध्दहस्त लेखक, संपादक, पर्यावरण रक्षणार्थ झटणारा व दहशतवादाविरुध्द आवाज उठवणारा सजग कार्यकर्ता म्हणून त्यांची ख्याती आहे. फ्रान्सिस दिब्रिटो यांनी 1972 मध्ये धर्मगुरूची दीक्षा घेतली. दीक्षित धर्मगुरुपदासाठी आवश्यक शिक्षण घेताना फादर दिब्रिटो यांनी ख्रिस्ती धर्माचे तत्त्वज्ञान व चर्चच्या इतिहासाचा अभ्यास केला. तसेच, त्यांनी इतर धर्मांचाही अभ्यास केला. त्यामुळे त्यांच्या विचारांना चौरस बैठक लाभली. ते निष्ठावंत कॅथलिक असले तरी त्यांची धर्मनिष्ठा आंधळी किंवा भाबडी नाही. तेव्हापासून त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व धार्मिक स्वरूपाच्या कार्याला गती मिळाली. त्या आधीपासून त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीची सुरुवात झालेली आहे; ती चालूच आहे.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी पर्यावरणाच्या रक्षणासाठी वसईतील काही जागृत नागरिकांच्या सहकार्याने 'हरित वसई संरक्षण समिती'ची स्थापना 1988 या वर्षी केली. तेव्हापासून त्यांचे पर्यावरणविषयक जागृतीचे सत्र चालू झाले. यात विहिरी, बावखले वाचवणे, विहिरींतील पाण्याचा उपसा करून पाणी पुरवणा-या टँकरवर बंदी घालणे, जमिनविक्री थांबवणे अशा बाबी अग्रस्थानी होत्या.वसईत कायद्याचे राज्य संपुष्टात आले असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यावर आणि कोणातही त्याविरूध्द ब्र काढायची हिंमत राहिलेली नसताना त्यांनी एकट्याने पोलिसकचेरीत जाऊन निषेधयात्रेची सुरुवात केली. मात्र, हजारोंचा लोकसमुदाय त्यांच्या पाठीशी धिटाईने उभा राहिला. त्यांनी या समितीच्या माध्यमातून वाचक चळवळ उभारली, वाचक मेळावे घेतले.

'सुवार्ता' हे कॅथलिक समाजाचे मुखपत्र 1955 मध्ये फादर डॉमनिक आब्रियो यांच्या संपादकत्वाखाली उदयास आले. फादर दिब्रिटो यांनी 'सुवार्ता'चे संपादक म्हणून जबाबदारी 1983- मध्ये स्वीकारली आणि 2007 पर्यंत संपादनाचे असिधाराव्रत अव्याहतपणे चालवले. मराठी भाषिक ख्रिस्ती समाजाचे मुखपत्र असलेल्या 'सुवार्ता' या मासिकाचा आशय आणि आविष्कार ह्या दृष्टीने अंतर्बाह्य कायापालट करण्यात फादर दिब्रिटोंचा महत्त्वाचा सहभाग आहे. सामाजिक प्रबोधनविषयक विचारांच्या स्पर्शाने 'सुवार्ता' मासिक ख्रिस्ती समाजापलीकडे जाऊन पोचले. दिब्रिटोंनी ख्रिस्ती लेखकांव्यतिरिक्त अन्य समाजातील लेखकांनाही सहभागी करून घेतले. स्वदेश, स्वभाषा, स्वसंकृती या मूल्यांवर घाला घातला जात असताना त्या मूल्यांचे रक्षण करणे हेच त्यांनी आपले कर्तव्य मानले. 'मायमराठी'चे पांग फेडण्याची आपली प्रतिज्ञा त्यांनी 'सुवार्ता'च्या संपादनाने पूर्णत्वास नेली आहे. त्यातून अनेक साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक उपक्रम राबवले गेले.

त्यांच्या संपादनातील चौफेर दृष्टी विविध परिमाणे घेऊन येते. ती अन्यायाविरुध्द रणरागिणी होऊन गरजते. 'सुवार्ता'तील त्यांच्या संपादकीय लेखांतील भाषा, वैचारिक मांडणी, आवेशयुक्त वक्तृत्वगुण, त्यातील निकोप स्पष्टपणा, समाजहितासंबंधीची व्यापक कळकळ या वैशिष्ट्यांमुळे त्यांची लेखणी लक्षवेधी ठरते. त्यांच्या सखोल विचारांनी

परिप्लुत लेखनशैलीत साधेपणा आणि प्रसाद आहे. 'सुवार्ता'च्या शेवटच्या पानावरील चिंतने हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. त्यांत मानवी मूल्यांची जपणूक आहे.

फादर दिब्रिटो यांनी 1992 मध्ये पुणे येथे झालेल्या पंधराव्या मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषवले होते. विश्वात्मक साहित्य, पृथगात्म साहित्य, ख्रिस्तींची जीवनमूल्ये, 'बायबल'मधील साहित्यमूल्ये, साहित्यातील प्रवाह, अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक यांचे आदान-प्रदान, साहित्य आणि समाजमुक्तीचे तत्त्वज्ञान, मराठी भाषेच्या अस्तित्वाचा लढा, मातृभाषेतील शिक्षण इत्यादी विषयांचा परामर्श त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात घेतलेला आहे. बायबलचे सर्वसामान्यांना समजेल असे मराठी भाषांतर करण्याची त्यांची मनीषा आहे. ते सर्वधर्मसमभाव संमेलनेही योजत असतात.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी सामाजिकतेचे भान ठेवून कार्य करणा-या संस्थांच्या लोकमंगलाच्या कार्याला नेहमी प्रोत्साहन दिले आणि त्यांच्या कार्यात आपला सहभाग दिला. त्यांनी नर्मदा बचाव आंदोलनात मेधा पाटकरांना, भ्रष्टाचारविरोधी अभियानात अण्णा हजारेंना आणि सामाजिक शुश्रूषेच्या कार्यात साथ बाबा आमटेंना दिलेली आहे.

फादर दिब्रिटोंचा पिंड समाजचिंतकाचा आहे, तद्वतच तरल संवेदनशीलतेचे प्रत्यंतर त्यांच्या ललितरम्य लेखनातून घडते. त्यांनी प्रवासवर्णनांतून सामाजिक समस्यांचा वेध घेणारी निरीक्षणे मांडली. सृजनशील निसर्गाचा मोहोर आणि तेजाची पावले  त्यांच्या संवेदनशीलतेला भुरळ घालत राहिली. ती त्यांनी नेमक्या शब्दांत टिपली. निसर्गरम्य युरोपातील प्रेमापासून वंचित झालेल्या, रखरखीत बनलेल्या माणसांच्या जीवनातून ओॲसिसचा शोध घेत राहिले. तर संघर्षयात्रेने माखलेल्या, मरू मरू झालेल्या ख्रिस्तिभूमीत करुणेने पाझरणारा ख्रिस्त त्यांना दिसला. त्यांनी कुष्ठरोग्यांच्या जखमा साफ करणा-या मदर तेरेसांच्या सुरकुतलेल्या चेह-यावर आनंदाचे अंतरंग वाचले, त्यांचा जीवनाकडे सकारात्मक बघण्याचा दृष्टिकोन आयुष्याच्या प्रत्येक वळणावर त्यांना प्रसन्न व परिपुष्ट बनवत गेलेला आहे. इंग्लंडमधून आलेले येशुसंघीय कॅथलिक धर्मगुरू, फादर थॉमस स्टिफन यांनी 'पुष्पामाजि पुस्प मोगरी' म्हणत मराठीचा महिमा गाईला आणि मोगरीच्या परिसरातील वसईतील, मराठी भाषिक कॅथलिक धर्मगुरू असलेल्या फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी मराठीच्या मोग-याचा सुवास सर्वदूर पोचवलेला आहे.

साहित्याच्या मुख्य प्रवाहाबाबत विश्लेषण करताना फादर म्हणतात, साहित्यात विविध प्रवाह निर्माण होऊन ते मुख्य प्रवाहाला मिळायला हवेत. साहित्यिकांनी स्वत:च्या जगण्याला कुंपण घालून घेऊ नये. त्यामुळे साहित्याच्या पालखीत राज्यघटना असल्यास काहीच हरकत नाही, कारण धर्मग्रंथ हे संस्कृतीचे संचित आहेत. धर्मग्रंथांत काही गोष्टी कालसापेक्ष तर काही कालविसंगत असतात. त्यामुळे वैज्ञानिक व मानवतेच्या दृष्टीने त्याची चिकित्सा होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानामुळे सर्व समाजघटकांना समानता प्राप्त झाली आहे. म्हणूनच साहित्याच्या पालखीला आता व्यापक रूप येणे आवश्यक आहे.

प्रा.डॉ.सिसिलिया कार्व्हालो
माणिकपूर,वसई (प.)

---------------------------------------------------

**फ्रान्सिस दिब्रिटो यांचे साहित्य:-**

- सुबोध बायबल
- परिवर्तनासाठी धर्म प.स.दिब्रिटो फ्रा. थ 90   105656
- ख्रिस्ताची गोष्ट ( बालड.मय) 0 द : 31 दिब्रिटो फ्रा थ 91
- ख्रिस्ती सण आणि उत्सव पद्द: 457  दिब्रिटो फ्रा.थ 98 123423

- संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची ल 463: 25 दिब्रिटो फ्रा न 04 135487
- अध्यक्षीय भाषण, सहावे बंधुता संमेलन, अहमदनगर द: 5 दिब्रिटो फ्रा न 05 137769
- पोप दुसरे जॉन पॉल जीवनगाथा
- तरंग

**व्यक्तिपरिचय:-**

जन्म- 4 डिसेंबर 1943, नंदाखाल,पो. आगाशी, तालुका: वसई
शिक्षण- संत जोसेफ मराठी हायस्कूल, नंदाखाल, वसई येथे माध्यमिक शिक्षण धर्मगुरुपदाचा दहा वर्षांचा अभ्यासक्रम, इंग्रजी माध्यम, संत पायस महाविद्यालय, गोरेगाव, मुंबई.
1972 धर्मगुरू म्हणून दीक्षा स्वीकार
बी.ए. (समाजशास्त्र), पुणे विद्यापीठ
साहित्य आचार्य, पुणे
एम.ए. (धर्मशास्त्र), पुणे

**कार्य:-**

- संपादक- 'सुवार्ता'- (1983-2007)
- संस्थापक- हरित वसई संरक्षण समिती. 1988
- अध्यक्ष- मराठी ख्रिस्ती साहित्य संमेलन, 10,11,12,जाने1982, पुणे
- प्रकाशित साहित्य:-
- तेजाची पाऊले (ललित), अक्षर प्रकाशन, मुंबई फेब्रु. 1995
- ओॲसिसच्या शोधात (प्रवासवर्णन), राजहंस प्रकाशन, पुणे, फेब्रु. 1996 (1979 पासून फादरनी आखाती देशांपासून युरोपातील अनेक देशांत प्रवास केला. या भ्रमंतीतून, विशेषत: तेथील समाजजीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केलेला आहे.)
- सृजनाचा मोहोर (ललित), नीळकंठ प्रकाशन, पुणे, मे 2002
- संघर्षयात्रा ख्रिस्तभूमीची, राजहंस प्रकाशन
- याव्यतिरिक्त आणखी दहा पुस्तके प्रकाशित

**पुरस्कार:-**

- पत्रकारितेसाठी- 'लोकमत' - नागपूर. प्रथम पुरस्कार- 1993
- दर्पण पत्रकारिता पुरस्कार, सातारा- 1994
- ललित लेखनासाठी- 'ओॲसिसच्या शोधात'साठी भैरुरतन दमाणी पुरस्कार, सोलापूर,1986
- अनंत काणेकर, पुरस्कार, 'ओॲसिसच्या शोधात'साठी
- कोकण मराठी साहित्य परिषदेचा पुरस्कार, सन 1997.2003,2005
- समाजसेवेसाठी- रेव्हरेड नारायण टिळक पुरस्कार, पुणे- 1996
- महात्मा गांधी पुरस्कार, पुणे 2003

**संदर्भ :-** ↑ सिसिलिया कार्व्हालो.. थिंकमहाराष्ट्र.कॉम.

**व” हे मासिक वर्षभर झाले यशस्वीरीत्या प्रकाशित होत आहे, या मासिकाविषयी एक कुतूहल मनात होतं, म्हणूनच त्या विषयी जाणून घेण्याचा हा प्रयत्न खुद्द “व” मासिकाचे संपादक फेलिक्स डिसोजा यांच्याकडूनच केला आहे, नवोदित कवि-लेखकांसाठी एक नवीन संधी निर्माण करत आहे, “”व”” म्हणजे साहित्याची पंचतारांकित मेजवानीच जणू, फेलिक्स व टीम यांनी घेतलेला हा साहित्याचा वसा असाच अखंड चालत राहावा ही त्यांना सदिच्छा. – संपादक**

# चंगळवादात वैचारीक उत्सवाचा मांडव “व”

“व” च्या असण्यासंदर्भात काही महत्वपूर्ण घटनांचा उल्लेख होणे येथे फार महत्वाचे ठरेल. नेमके कधी हे सांगता येणार नाही पण कवी इग्नेशियस डायस आणि मी सुरवात केली ती जे. कृष्णामूर्ती आणि ओशो यांच्या वाचनातून. या सर्वांच्या विचारातून निर्माण होणारा ताण आपआपसात चर्चा करून घालवायचा, त्यातून काही प्रश्न निर्माण करायचे त्यावर, पुन्हा चर्चा करायची. हाती काही लागते असे वाटत असताना पुन्हा स्वत:चे चकवा देणारे विचार अस्वस्थ करायचे.

मुळातच नाटक या कलाकृतीची आवड आणि ते पाहण्यासाठी आम्ही रात्री अपरात्री कुठे कुठे जायचो आणि खुपदा तर आम्ही यासाठी पुण्यातही रात्रभर तळ ठोकून असायचो. दरम्यानच्या काळात मुंबईत झालेली बरीचशी प्रायोगिक नाटके पाहण्यासाठी कसरत करावी लागत असूनही आम्ही ती पाहिली . त्यातल्या पात्रावर, त्याच्यातला संवादावर चर्चा करू लागलो, अशा चर्चेत आम्ही काही रात्र जागून काढल्या आहेत. ही कसली भूक होती माहित नाही पण सारं आपसूक होत होतं. अशा चर्चेतून जी. ए., ग्रेस, तेंडूलकर, एलकुंचवार आणि जे जे मिळेल ते फार नाही पण महत्वाचं मोजकं आम्ही वाचू लागलो. चर्चेच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या तसे कुठेतरी लिहू लागलो आणि आपण काही लिहितोय हा विश्वास कधीतरी निर्माण झाला आणि 2005 साली माझा “प्राणातले दिवे” हा कवितासंग्रह माझ्या हौशेमुळे आणि माझ्या मित्रांच्या सहकार्यांने प्रसिदध झाला. (त्यातल्याच बराशच्या कविता आता मला स्वत:ला आवडत नाहीत ही गोष्ट वेगळी) पण त्या निमित्ताने मराठी साहित्य क्षेत्रातील मान्यवर कवीं लेखकांचा परिचय होऊ लागला. साहित्याच्या संदर्भात अनेक कार्यक्रमांना आम्ही उपस्थित राहू लागलो. त्याचवेळी फा.फ्रान्सिस दिब्रिटो यांनी चालू केलेले साहित्यसंमेलने, व्याख्यानमाला यातील आमचा वावर आमच्या प्रवासात दिशादर्शक म्हणून महत्वपूर्ण ठरला.

प्रा. सिसिलिया कार्व्हालो यांच्याशी झालेल्या भेटी चर्चा, स्व. प्रा. सिद्धार्थ तांबे यांच्याशी जुळलेला वैचारीक मेळ ही सारी आमची वैचारीक गरज होती. आमची काहीएक वैचारीक बैठक तयारी होत होती. ती वयानुरुप आलेल्या प्रगल्भतेने बदलतही आहे.

कदाचित एरव्ही मी कधी या विषयावर किंवा हे सारं लिहिलं असतं किंवा भुतकाळ उगाळत बसण्यासाठी सध्याचं कतृत्व फार मोठे आहे असंही मी मानित नाही. ”व” च्या संदर्भात बोलायचे झाल्यास ही पार्श्वभूमी महत्वाची वाटली.

हे सारं होत असताना “युवा विकास संस्था” या संस्थेत आम्ही सामाजिक उपक्रम राबवित होतो. समाजाच्या चांगल्या वाईट घटनेवर मित्रमंडळी एकत्र येऊन चर्चा करीत होतो. वेगाने बदलत चाललेल्या काळाविषयी बोलत होतो. फा. दिब्रिटो सुवार्तेतून गेल्यानंतर सुवार्तेचे स्वरूप बदलले. ते अधिकाधिक धार्मिक होऊ लागले. हा झालेला बदल चांगला किंवा वाईट यात शिरायची गरज नाही पण चर्चेतून असे लक्षात आले की वसईतून निघणारे एकही वाङमयीन

नियतकालिक आपल्याकडे नाही. कवी वर्जेश सोलंकी ,गणेश वसईकर , नाटककार जेकब डिसोजा यांच्याबरोबर झालेल्या चर्चेतून "व" चा जन्म झाला.

केवळ वसईचा म्हणून साहित्यासाठी प्रांताच्या सिमारेषा आखण्यात काही अर्थ नसतो. म्हणून "व" वसईतून निघणारे महाराष्टातील नियतकालिक असावे यासाठी प्रयत्न चालू झाले.

"व" या नावातून समन्वय अभिप्रेत आहे. सध्याच्या उतरावरून घरंगळत गती घेतलेला हा काळ आहे. जगण्यासाठी आणि तेही सुखासीन जगण्यासाठी आवश्यक साधनांची रेलचेल आहे. जग बदलंय. जे काल इथल्या परंपरेचं संस्कृतीचं, भाषेचं भुषण होतं त्याचं अस्तित्व नष्ट होऊन नव्या गोष्टी समाजजीवनात धुमाकुळ घालत आहेत. अधिक सुखसिनतेपायी माणूस त्याकडे खेचला जात आहे. खेडयातील लोक शहराचा झगमगाट पाहून शहराकडे धावत आहे. शहरातील लोकांना गावपण हवे आहे, शेती तंत्रज्ञानात प्रगती झाल्याने शेती करण्याच्या पदधतीत सोय निर्माण झाली आहे तरी शेतकरी हवालदील आहे. जगाशी भाषा शिकणाऱ्या मुलाला आईवडिलांशी चर्चा करण्यात भाषेची अडचण येत आहे अशा या विसंगतीने भरलेला हा काळ आहे. या साऱ्यात समाजजीवन ढवळून निघत आहे. अशा वातावरणत स्वत:चा पराभव , निर्माण झालेली विषण्णता टिकविण्यासाठी उत्सवाचे निमित्त शोधून आपल्या समृदधीचा, सुखाचा आव आणण्याची नविन पदधत समाजजीवनात रूढ झाली आहे.

भौतिक सुखाचे नानाविध इमले रचून त्यातून निर्माण झालेल्या आभासी जगामागे धावणारी तरूण पिढी मूल्यहीन होत असलेल्या समाज वातावरणात आपली ठळक स्वतंत्र अशी जीवनशैली विकसित करीत आहेत.

समाजजीवनातील नेमकी गरज माध्यमानी ओळखली आहे किंवा तुम्हीच खरे गरजवंत आहात आणि आम्ही तुमच्या साऱ्या गरजा भागविण्यासाठी आम्ही कसे तत्पर आहोत हा विश्वास निर्माण करण्यास ते कमालीचे यशस्वी झाले आहेत. त्यातून मनोरंजनच्या संकल्पना बदलल्या. कलाकृतीचे मापदंड बदलले.

मनोरंजनाच्या नव्या नव्या क्लुप्त्या माणसाला त्याच्या मुळ वास्तवातून दूर नेत आहेत. जागतिकीकरणातून फोफावलेला चंगळवाद माणसाला त्याच्या मुळापासून उखडून टाकत आहे.

सभोवतालचं वास्तव इतकं विसंगत विभ्रम निर्माण करणारं आहे की एक सैरभैर अवस्था साऱ्या वातावरणात भरून आहे.

जग जवळ आल्यासारखं चित्र आहे पण माणूस माणसापासून फाकला जात आहे. जीवनासाठी आवश्यक विचार करण्याची शक्यता धूसर होत आहे. त्यासाठी असलेली कला, साहित्य यांची गरज संपत चाललीय. कला, साहित्य याचं जीवनातील स्थान संकुचित होत आहे.

समोर असं अस्वस्थ करणारा भवताल आणि त्यात "व" नावाचं वाङमयीन नियतकालिक असणं फार जिकरीचं आहे,. पण या नावात जसा समाजजीवनाचा खऱ्या अभिजात जीवनानुमुख साहित्याशी समन्वय साधण्याचा जसा प्रयत्न आहे तसा त्यात अपूर्णतेची जाणीव आणि पूर्णत्वाची ओढ अभिप्रेत आहे.

त्या दिशेने "व" चा प्रवास चालू आहे. कोसळत असलेल्या मानवी जीवनमानाचं वास्वव चित्रण करणारी , नव्याने आदळणाऱ्या जीवनशैलीला आपल्या लेखनाने प्रतिसाद देणारी नविन मंडळी लिहिती झाली आहे. कविता हा आमच्या जिव्हाळयाचा आणि आवडीचा विषय असल्याने महाराष्ट्रातील गंभीररित्या लिहिणाऱ्या अनेक लोकांच्या कविता आपण "व"मध्ये सातत्याने छापत आहोत. इग्नेशिअस डायस, जुई कुलकर्णी, ओंकार डिंचवलकर, प्रणव सखदेव, प्रेषित सिद्दभटटी, चैताली अहेर, मनिषा साधू, साकेत कानेटकर, ओंकार कुलकर्णी, सुजीत पाठक, महेश लिला पंडीत, एर्डवर्ड डिसोजा ही अशी अनेक नव्या मंडळीची कविता "व" मधून प्रसिदध होत आहे. बदलत्या समाजजीवनाचं

वास्तव ते आपल्या स्वत:च्या आवाजातून मांडत आहेत. हे व इतर "व"शी जोडले जात असलेल्या या कवीची कविता नव्वोद्त्तरी नंतरच्या पिढीची समृदध शक्यता आहे असे आम्हास वाटते.

नव्या मंडळीबरोबर साहित्यव्यवहाराकडे फार गांभिर्याने पाहणाऱ्या प्रविण बांदेकर , फा. फ्रान्सिस दिब्रिटो , प्रा. सिसिलिया कर्व्हालो यांच्या मुलाखती, अभिनेता अतुल कुलकर्णी यांची मुलाखत याव्दारे एकूणच त्याच्या कतृत्वाची साहित्याची ओLख करून देण्याचा ,जुन्या नव्यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न "व"च्या माध्यमातून चालू आहे.

कविता हा जरी "व"चा जिव्हाळयाचा विषय असला तरी चित्र, संगीत , कथा , कांदबरी , नाटक यासदंर्भात सध्याच्या जीवनजाणिवा प्रकट करणारे तरूणांचे साहित्य पुढे आणण्याचे, मुळ प्रवाहात आणण्याचे काम आम्हाला करायचे आहे.

वर्षभरातील "व"च्या प्रवासात महाराष्टातील अनेक मान्यवर , नविन तरूण लेखक , कवी ,वाचक जोडले जात आहेत. या माध्यमातून मराठी साहित्य सांस्कृतिक क्षेत्रात अनेक नविन लिहिते चेहरे आणि वाचकवर्ग निर्माण होईल हा विश्वास वाटतो.

त्याचबरोबर वसईतला स्थानिक लेखक कवीना महाराष्टात लिहिल्या जात असलेल्या साहित्याची ओळख व्हावी त्यांच्या लेखन प्रवासासाठी समृदध व्यासपीठ असावं हेही महत्त्वाचे काम "व" करीत आहे.

भवताल अनेक मनोरंजनाच्या भंपक संकल्पनानी भारलेला असला तरी त्या त्या काळात त्या त्या काळाचं प्रतिनिधित्व करणारी कलाकृती जन्म घेत असतेच आणि चांगला रसिक अशा कलाकृतिचा शोध घेतल्यावाचून राहत नाहीत या दोघांतला सांकव बनून समन्वय साधण्याचा प्रयत्न "व" करीत राहील असा विश्वास आम्हाला वाटतो.

**फेलिक्स डिसोजा , संपादक "व", भुईगाब**

**सचिन मेंडिस हे सिद्धहस्त लेखक-कवी आहेत, अनेक उत्कृष्ट लेख कविता त्यांच्या लेखणीतून साकारल्या आहेत, ते हाडाचे सामाजिक कार्यकर्ते आहेत, स्वाभिमानी वसईकर या संस्थेचे संस्थापक सदस्य तसेच सध्या ते जनरल सेक्रेटरी आहेत. त्यांना त्यांच्या पुढील साहित्यिक व सामाजिक वाटचालीसाठी अनेक सदिच्छा - संपादक**

# निसर्गशास्त्र नीतिशास्त्रापेक्षा श्रेष्ठ?

दूरचित्रवाणीवरील जंगली प्राण्यांचा कार्यक्रम बघत होतो. कुठल्या तरी जंगलात हरीणांचा कळप नदीकिनारी पाणी पिण्यासाठी जमला होता, अचानक झुडुपात दबा धरून बसलेल्या वाघाने कळपावर हल्ला चढवला आणि सगळी हरिणे जीव वाचवण्यासाठी सैरा-वैरा पळू लागली. एका हरिणाच्या पिल्लाचा वाघाने शेवटपर्यंत पाठलाग सोडला नाही, आणि शेवटी थकलेले ते पिल्लू शिकारी वाघाच्या तावडीत सापडले आणि प्राण गमावून बसले. हरिणाच्या पिल्लाचे प्राण वाचावे असे मनापासून वाटत होते परंतु नियतीला किंबहुना निसर्गशास्त्राला ते मान्य नसावे हेच खरे. मन विचार करू लागले की वाघाने पाप केले का? त्या गरीब बिचाऱ्या पिल्लाचा जीव घेण्याचा वाघाला काय अधिकार? वाघाने आपल्या उदरनिर्वाहासाठी दुसरा अहिंसक पर्याय का शोधू नये? वाघाची नीती चांगली की वाईट?. माझ्या मनानेच मला उत्तर दिले की नक्कीच निसर्गशास्त्र हे नीतीशास्त्रा पेक्षा श्रेष्ठ असावे. वाघाला जगण्यासाठी निसर्गाने त्याला हरणापेक्षा दिलेल्या जास्त नैसर्गिक क्षमतेचे ते उदाहरण होते.

निसर्गशास्त्र नीतीशास्त्रा पेक्षा श्रेष्ठ हे ठरवताना मला डार्विनचा उत्क्रांतिवादाचा सिद्धांत आठवतो, या सिद्धांताचा सर्वसाधारण गोषवारा असा की "प्राणीजगतात वंशसातत्याची सहजप्रवृत्ती असते. नैसर्गिक परिस्थितीतील बदलांना तोंड देऊन जे जगू शकतात, त्यांनाच वंशसातत्य टिकवता येतं. अशा बदलांना तोंड देऊन वंश चालवू शकणारे हेच खरे जगण्यायोग्य सजीव". खरोखर उत्क्रांतिवादाचा सिद्धांत इथेही लागू पडत आहे, हरिणांना जगण्यासाठी किंबहुना वंशसातत्य टिकवता येण्यासाठी वाघांना तोंड देवू शकेल अशी क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे ज्याबाबतीत ते कमी पडले आहेत. थोडक्यात माझ्या आकलनाप्रमाणे निसर्गशास्त्र म्हणजे 'जे प्रचलित परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतात ते जगतात, जे जुळवून घेऊ शकत नाहीत ते नष्ट होतात किंव्हा मरत-मरत जगतात'. हरीण कमजोर होते, त्याची ताकत वाघापुढे चालू शकली नाही हेच वास्तव होते. तेथे नीती-अनीतीचा प्रश्नच नव्हता. हरिणाला जर वाघाचा सामना करून जिवंत राहायचे असेल तर किमान वाघाच्या नैसर्गिक क्षमतेच्या एक पाऊल पुढे राहावे लागेल हे निसर्गाला अभिप्रेत असावे आणि तीच आजच्या दुनियेची रीत आहे.

पशु-पक्ष्यांना लागू असणारे वरील सर्व निसर्ग नियम सर्वश्रेष्ठ अशा मानव प्राण्यालाही तंतोतंत लागू पडतात हे आज दिसून येते. प्रत्येक दिवशी पावलो-पावली निसर्गशास्त्र हे नीतिशास्त्रा पेक्षा श्रेष्ठ आहे ह्याची परिणीती होत आहे. 'ज्याची लाठी त्याची मैह्स' हे निसर्गालाच अभिप्रेत असावे आणि फक्त चांगला समाज बनवण्यासाठी धर्मपंडितांनी आणि समाजधुरीणांनी नीतिशास्त्राची निर्मिती केली असावी, असे आज ज्या पद्धतीने देश आणि समाज चालला किंबहुना चालविला जात आहे त्यावरून मला वाटते. आज देशात गुंड मंडळी, भ्रष्ट लोकप्रतिनिधी, लबाड सरकारी अधिकारी जनतेला नाडून अनीतीने अमाप पैसा कमवत आहेत, तेव्हा वाटते की देव ह्या मंडळीला ह्याच जन्मात अद्दल का घडवत नाही?. का अशा मंडळीला त्यांच्या पापाची शिक्षा होत? . नीतीने वागणारा गरीब बिचारा माणूस आज साध्या तापाने

उपचाराविना मरतो तर दुसरी ठिकाणी मोठे दुर्धर आजार झालेली ही भ्रष्ट मंडळी आपल्या पैशाच्या व सत्तेच्या ताकदीने परदेशात महागडे उपचार घेवून दिर्घायुशी होतात हे आपण पाहतच आहोत. कमी ताकदीचा गरीब माणूस प्रचलित परिस्थितीशी जुळवून घेण्यात कमी पडल्याने ह्या दुनियेत राहू शकत नाही तर ह्याच दुनियेत पैसेवाला सत्ताधारी माणूस परिस्थितीला आपल्या काबूत ठेवू शकतो आणि अनीतीने राहू शकतो हेच वास्तव नाही का?.

मला हरीण-वाघाची कथा मानव जातीसाठी समर्पक वाटते. सामान्य माणूसरुपी हरीण आज ह्या सत्ताधारी वाघांपुढे हतबल झालेला दिसतो, तो व्यवस्थेशी लढायचा प्रयत्न करतो पण त्याचे प्रयत्न तोकडे पडतात. निसर्ग त्याला साथ देत नाही असे नाही, परंतु व्यवस्थेशी लढण्यासाठी हवी असलेली संघटीत क्षमता उभारण्यास तो कमी पडतो. जे प्रचलित परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतात, लढू शकतात, ते जगतात, जे जुळवून घेऊ शकत नाहीत ते नष्ट होतात किंव्हा मागे पडतात हे आजचे वास्तव आहे. त्यामुळेच आज सर्वच जनतेला हे कळूच चुकले आहे की ताकदवर माणसाच्या संपर्कात राहिल्यावर आपली ताकद वाढते आणि आपल्याला सामजिक सुरक्षितता व फायदे मिळतात आणि म्हणूनच कितीही धर्माचे व तत्वाचे ढोल पिटले तरीही लोकांचा राबता नीती-तत्वे पायाखाली घालणाऱ्या सत्ताधारी मंडळीकडेच दिसून येतो. जी मंडळी नीतीवर विश्वास ठेवतात त्यांना अजूनही वाटते की वाईट प्रवृत्तीच्या माणसाला त्याच्या पापांचा हिशोब ह्याच दुनियेत द्यावा लागेल मग ते कितीही ताकदवर होवो. असो, हे असेच चालायचे. आपण वाट बघूया की असाही दिवस येईल जेव्हा हरिणाची शिकार केलेला वाघ आपल्या पापामुळे तडफडून मरून जाईल किवा हरीण वाघाशी दोन हात करून त्याला टक्कर देईल। तूर्तास निसर्गशास्त्र हे नीतीशास्त्रा पेक्षा श्रेष्ठ असल्याने हरणास जगण्यासाठी पळावेच लागेल, आणि हो आपल्यालाही.

**सचिन मेंडिस, बोळींज**

**श्री. सायमन रॉड्रिग्ज हे टेक्साइल इंजिनियर आहेत, पुणे येथे ८ वर्षे टेक्साइल मशीनरी व मार्केटिंग क्षेत्रात काम केले आहे, सध्या इंपोर्ट- एक्सपोर्टचा बिझनेस करत आहेत, त्यांना वाचन व संगीत यात विशेष रुची आहे.वसईतील सामवेदी ख्रिस्ती समाजातील काही तरुणांनी चालू केलेल्या “”कुपारी कट्टा”” या साहित्यिक चळवळीचे ते चेयर पर्सन आहेत. – संपादक**

# लग्नाआ बजेट

परवा पप्पू ट्रेन मिने भेटलो. “अंकल, लग्नायी डेट ठरली... २०१४ जानेवारी.... लगीन जोरात कऱ्यासा हाय...
मे त्या अभिनंदन करोन त्याला विसारला... “जोरात मनजे का रे?”

“जोरात मनजे... हिणवार, आयतवार... प्रोगाम, ड्रिंक्स.. करास बॅंड..ई... पण अंकल लग्नाला कोडो खर्च येदे हांगू?”

पप्पू आ या प्रश्नावरती मे विसार केलो.... आन जा कय माला दिखला ता आडे डावड्यासो प्रयत्न केले.

१) गोल्ड :- पोर- कमीतकमी ६ तोळे.. पोरी –कमीतकमी १० तोळे- ३.५ ते ५.०० लाख रुपये... जर वाडवडला जुना होंना हायदे तरी कमीतकमी २ लाख घडती चार्जेस हातूस.

२) पोरा आ फर्निचर – कमीतकमी १.५ ते २ लाख रुपये.

३) लग्नाये कपडे – पोर- ५०००० ते ८००००  पोरी – १ लाख मिनिमम रुपये

४) प्रत्यक्ष लग्नायी तयारी.. पत्रिका...मीटिंग्स...सुखी-दुखी--- ५०००० रुपये

५) बॅंड – ४०००० ते ५०००० (जर नवापुर बॅंड हायदे ते २५-३० मिने काम होते

६) मंडप- ७०००० रुपये

७) तळान – ५०००० रुपये

८) ड्रिंक्स – ५०००० रुपये

९) जिवान (१२०० लोकाकरता) प्रत्येकी २५० रु. प्लेट – ३ लाख

१०) सौदीओ - ५०००० रुपये

११) हनिमून – ८०००० रुपये जर बायर जसा हायदे ते १ लाख कमीतकमी

१२) इतर ... (पोस्ता—पयला लगीन हायदे ते साडयो वाटणी, शर्ट पीस, पॅंट पीस देना) – ५००००

“पप्पू, घरसा होणा हायदे ते तूआ जोरदार लगीन तुला १२ लाखाला पडदे रे”... पप्पूये डोळे पांढरे झाले

मंडळी, आपुन गेल्या 2/3 वहारामिने आपली कॉस्ट ऑफ लिविंग कोडी वाढले याव विसार केले गा?... खाला एक टेबल दिले त्यावरने तुमश्या लक्षात येदे.

टेबल १

| आयटम | २०१० साल सो भाव (रुपयात) | २०१२ साल सो भाव (रुपयात) |
| --- | --- | --- |

| | | |
|---|---|---|
| गॅस सिलिंडर | ४५० | ९०० |
| लाइट बिल प्रत्येक महिन्यात | ७००/८०० | १२००/१३०० |
| पेट्रोल | ६५ | ८० |
| मटन | २८० | ३५० |
| डुकरा मटन | १६० | २२० |
| वालायो हिंगो | ८० | २५० |
| सरासरी ४ जना करता जीवना मावरा | १०० | २०० |
| सावुळ किलो | २८/३० | ४०-५० |
| पोरायी शाळीशी फी आन मासिक खर्च यात ऑटो आन ट्यूशन फी. | १०००/ १२०० | २०००/२५०० |
| पोर इंजिनीअर किंवा कॉलेजला हायदे ते | ६०००० | १२०००० |
| कपडे लत्ते | २०००० | ३०००० |
| ट्रेन/बस. रिक्शा भाडा | १००० | २००० |

वरश्यो ज्यो गोष्टी हात त्याव खर्च आपुन अवॉइड करू शकात नाय... २ वाहरामिने ४ जना घर सालव्यासो खर्च १०००० होतो तो आते १८००० ते २०००० रु. झाले.

आते खाला यो वस्तु दिल्यात जो आपल्याला पात आपुन त्यांना चैनीयो वस्तु मानून हंगू शकात्याव.

टेबल २

| आयटम | २०१० साल सो भाव (रुपयात) | २०१२ साल सो भाव (रुपयात) |
|---|---|---|
| होना १० ग्रॅम | २५००० | ३२००० |
| दारू | ५०० | १००० |
| बीअर | ६५ | १०० |
| पिकनिक ८ दिहाशी ४जनाकरता | ५०००० | १००००० |
| घर बान्ध्यासो खर्च (१ + १ सो बंगलो) | २० लाख | ३० लाख |
| होटेलिंग(४ जन) | ८०० | २००० |
| पिक्चर (फन फिएस्टा – ४ जन) | ४०० | १००० |
| लगीन ८०० माहणे | ८ लाख | १२ लाख |

आते वर्सो खर्च पण खुब वेळेला गरजेओ हाय आहा आपल्याला वाटाते...आदे पण महागाई जवळपास ५०% वाढले

आपल्या इन्कम २०१० आन २०१२ यात कोडा वाढला? जास्तीतजास्त २०% नाते २५% ... आन खर्च कोडो वाढलो ७५% ते १००%... मग पुढे आपल्याला तिकोन ऱ्यासा हायदे ते का कऱ्या पाय?

- महागाई आपुन रोखू शकत नाव ,, मग आपल्याला आपला इन्कम त्याप्रमाणे वाढव्या पाय... सगळयांनास ता शक्य नाय

- मग आपलो खर्च कमी कार्य पाय, टेबल १ मिने जा कय हाय तडे ते आपुन खर्च कमी करू शकत नाय
- मग टेबल २ मिने जा हाय तडेआपुन खर्च कमी करू शकात्याव

आन त्यामिने आपुन सध्या लग्नावरती जो खर्च करत्याव तो कंट्रोल मिने हाडलो ते आपलेस पैशे वासू शकात्यात जे आपल्यालास पुढे लागू शकात्यात..

मग परत पप्पू आ प्रश्नावरती आपुन बाघो

"अंकल, ओडे पैशे हाड्याशे कड्शे?... मग बजेट मिने लगीन कऱ्यासा हाय दे ते ?"

"एक दिहासा लगीन, कॉमन प्रोग्राम करा .. तडे कमीत कमी २ लाख वाशेद्यात. ऐपत नाहेदे ते होना कमी करा.. फर्निचर, कपडे या वर कंट्रोल ठवा... ड्रिंक्स, सौदीयो, तळान… ऐच्छिक विषय हाय.. पण तडे १.५ ते २ लाख जात्यात"

"अंकल, तरी सुद्धा बजेट लगीन हांगीला मंजे ५/६ लाख पातूस.." पप्पू आकडेमोड कऱ्या लागलो

मंडळी, महागाई भयंकर वाढत साललो , गॅस , पेट्रोल, ट्रेन सो पास, खाण्या पेनयाव वस्तु.. त्या प्रमाणामीने कमाई वाढ नाय,,, सोहळ्यावरती ओडाखर्च करना आते आपल्याला परवड्यासा नाय आन कर्ज कडोण ते आहे सोहळे अजिबातुस करो नाका...

सगळ्यांना नाताळश्या हणायो खुब  शुभेच्छा..

**सायमन फिलिप रॉड्रिग्ज, आगाशी, क्रॉस नाका**

**जेम्सन डिमेलो हे सध्याच्या काळातील नवीन लिहिणाऱ्यापैकी एक, त्यांना सुद्धा लिखाणाची आवड आहे. हे पत्र स्त्रियांना भोगवस्तू समजणाऱ्या पुरूषांना एक चपराक आहे. त्यांच्या हातूनही मराठी भाषेची सेवा व्हावी ही त्यांना सदिच्छा – संपादक**

# एक अनावृत पत्र

अतिप्रिय नराधमा,

विचित्र वाटले ना, अतिप्रिय आणि नराधमा हे वाचताना. पण खरच रे हा प्रश्न मलासुध्दा पडला आहे. खरच किती प्रिय असतोस तु मला, जेव्हा मी तुझी मुलगी असते आणि तु एक करुणामय बाप. किती काळजीपूर्वक पालनपोषण करतोस तु माझा. जेव्हा तु माझा भाऊ असतो आणि मी तुझी बहीण, किती भरवसा असतो माझा तुझ्या दादागिरीवर. कोणाची हिम्मत असते का माझ्यावर नजर टाकण्याची. नंतर येतो माझ्या आयुष्यात एक पती बनुन. किती सुंदर नाते दोन अनोळखी जीवांचे. विश्वासाचे, आयुष्यभर साथ देण्याचे. या नात्यातुनच जन्म घेते पुढील नाते. एका आईचे आणि तिच्या मुलाचे. या नात्याशिवाय माझा जन्म अधुरा असतो. या नात्यांवरच ही जगरहाटी चालु आहे. किती प्रेम करतो आपण एकमेकांवर त्यामुळेच म्हणावेसे वाटते अतिप्रिय असे. परंतु....

हा परंतुच फार महत्त्वाचा वाटतो. हया परंतु मुळेच जन्म होतो एक नवीन नात्याचा, एका नराधमाचा. ज्या योनीमार्गातुन तु प्रसवतो, त्याच योनिमार्गावर तुझी वाईट नजर जाते. त्यातुनच तुझी बुध्दी भ्रष्ट होते. किती सहन करावे लागते त्यामुळे? तुझी ती वखवखलेली नजर रस्त्यावरुन जाताना मला मान खाली घालायला लावते. तुझा तो ओझरता स्पर्श मला प्लटफार्मवरच्या गर्दीत अंग चोरायला लावतो. तीस वर्षापुर्वी अशाच एका नराधमाने अरुणा शानबागवर केलेल्या अत्याचारामुळे तीचा तो लोळागोळा देह के.ई.एम.च्या एका खोलीत खितपत पडलेला आहे. मात्र तीच्या वर अत्याचार करणारा सोहनलाल जन्मठेपेची शिक्षा होऊन सुटला. नंतर स्वत:चे आयुष्य आनंदात जगला. याच अमानवी कृत्यामुळे पंचवीस वर्षापूर्वी एका नर्सवर रात्री बलात्कार करुन खुनी हल्ला झाला. ते कृत्य उघडकीस येऊ नये, म्हणून तिला सोबत करणाऱ्या तिच्या बापाला सुध्दा मारुन टाकण्यास मागेपुढे पाहिले नाही. आजसुध्दा ते कृत्य करणारे उजळ माथ्याने फिरत आहेत. त्यांचे हे कृत्य उघडकीस आलेच नाही रे. किती भरवसा असतो रे त्या दादावर. त्या दादानेसुध्दा माझी गय केली नाहीच. दहा वर्षापूर्वी मित्राबरोबर फिरत असताना त्याने माझ्यावर केलेल्या अत्याचाराला तर सीमाच नव्हती. भरदिवसा गजबजलेल्या समुद्र किनारी हे कृत्य करताना त्याला कायद्याची, जनाची, मनाची भिती वाटलीच नाही रे. तुझी नजर आज पुन्हा त्या अभागी जीवावर पडली. भरदिवसा निघुर्ण कृत्य करीत ही बस राजधानीत फिरत होती. खरच ही राजधानी कशाची रे? आज संपूर्ण देशातील स्त्री अत्याचाराची राजधानी झालेली आहे. मागील काही वर्षात हया राजधानीत घडणाऱ्या घटना पाहिल्या तर अचंबा वाटतो. लाज वाटते हया शहराला राजधानी बोलताना. कधी तंदूरीकांड तर कधी जेसिका. काही ना काही चालुच आहे. पण राजधानीच कशाला इतर शहरात सुध्दा हेच चालु आहे. हयासाठी काळ-वेळ-स्थळ यांचे बंधन नाहीच आहे रे. अशा घटना घडल्या की, काही सुबुध्द जनता, विचारवंत मागणी करतात अत्याचार करणाऱ्याला फाशीच दयायला पाहिजे. पण फाशी दिल्याने सर्व प्रश्न सुटतात का? फाशी त्याच्यावरचे उत्तर होऊ शकते का? फाशी दिल्याने ते कृत्य करणारा मारला जातो. पण विकृतीचे काय? प्रश्न फक्त अत्याचाराचा आहे का? नाही. प्रश्न विकृतीचा आहे. ही विकृती कशी नष्ट करणार? तुझा माझ्याकडे बघण्याचा जो दृष्टीकोन आहे तो कधी बदलणार रे? मी म्हणजे एक उपभोग्य वस्तु या पलिकडे माझा विचार करणार का रे? सिनेमामध्ये "तु चीज बडी है मस्त मस्त म्हणणारा तु. दाढीचे ब्लेडची, पुरुषांच्या डिओची जाहिरात करताना त्यामध्ये स्त्रीचा संबंध कसा येतो हे अनाकलनीय कोडेच आहे रे? याबाबत कोणी काही बोलतच नाही. त्या कोवळया मनांवर परिणामकारक संस्कार करण्याची जबाबदारी कोणाची? किती प्रश्न आहेत रे? कशी मिळणार उत्तरे या प्रश्नाला? कोण देणार ही उत्तरे? कधी शोधणार ही उत्तरे?

तुझीच,

कमनशिबी

**जेम्सन डिमेलो – नंदाखाल**

**माय लव, माय लाईफ या केविन आल्मेडा लिखित कादंबरीतील एक प्रकरण. प्रेम व मैत्री या विषयावर असलेली ही कादंबरी युवकांना नक्कीच आवडेल, केविन आल्मेडा यांचा कादंबरी लेखनाचा हा पहिलाच प्रयत्न असून ही कादंबरी वाचताना कुठेही असे वाटत नाही की एका नवोदित लेखकाने ती लिहिलेली आहे. २६ डिसेंबर रोजी या कादंबरीचे प्रकाशन होत आहे, केविनला पुढील साहित्यिक वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा. - संपादक**

## प्रकरण ११

गेल्यावर्षीपेक्षा ह्या वर्षीचा फ्रेन्डशिप डे थोडासा वेगळा होता. गेल्यावर्षी मी, रॉन, सोहा व ब्रिटनी कॉलेजच्या कॅन्टीनमध्ये बसलो होतो, पण ह्या वर्षी आम्ही किनारा हॉटेलच्या फॅमिली रुममध्ये. गेल्या वर्षी माझ्या समोरच्या खुर्चीमध्ये बसलेली सोहा ह्या वर्षी माझ्या बाजूच्या खुर्चीत बसली होती. दोन दिवसाआधी माझी फक्त फ्रेंड असलेली सोहा आता माझी गर्लफ्रेंड बनली होती. चमत्कार ह्या शब्दावर माझा विश्वास होताच आणि आता सोहाचाही विश्वास बसला होता. वेलेंटाईन डेच्या दिवशी तिला प्रपोज करणाऱ्या मुलाला तिच्या नावातील 'हा' ची आयुष्यभर प्रतीक्षा करावी लागणार होती कारण ज्याच्या नावात 'विन' आहे तो अखेर विजयी झाला होता. ज्या रात्री सोहाने मला पहिल्यांदा आय लव्ह यू म्हटले होते, ती रात्र जशीच्या तशी माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली.....

सहा ऑगस्टच्या पहाटेचा सूर्य उगवण्याआधीच सोहा माझ्या जीवनात भव्य प्रकाश घेऊन आली होती. त्या प्रकाशाने मग माझे सगळे जीवन उजळून टाकले होते. पाच तारखेला संध्याकाळी मी व रॉन रॉकबँडचा शो बघण्यासाठी मुंबईला गेलो होतो. शो संपायला रात्रीचे बारा वाजले मग जेवून निघताना एक वाजला. अंधेरीहून शेवटची ट्रेन किती वाजताची आहे ह्याची आम्हाला काडीमात्र कल्पना नव्हती. पण अचानक आठवण झाली आणि आम्ही धावतच रिक्षा पकडली. ट्रेन गेली तर तीन तास स्टेशनच्या बाहेर बसावे लागेल ह्याची आम्हाला काळजी वाटत होती. रात्रीचा सव्वा एक वाजला होता. सोहा माझ्याबरोबर मोबाईलवर चॅटिंग करीत होती. बिचारी गाढ झोपेत असताना तिला माझी आठवण आली होती व आम्ही पोहचलो आहोत की नाही ते विचारायला तिने मला मेसेज पाठवला होता. रिक्षात बसल्या बसल्या मी तिला मेसेज पाठवला होता कि, 'आम्हाला शेवटची ट्रेन मिळाली पाहिजे म्हणून प्रार्थना कर.' परंतु त्यावर मला भलताच रिप्लाय मिळाला होता 'मी तरी प्रार्थना करेन तुम्हाला ती ट्रेन मिळूच नये'. तिची प्रार्थना काही खरी झाली नाही कारण आम्ही प्लॅटफॉर्मवर पोहचलो तेव्हा ट्रेन यायला अजून तीन मिनिटे बाकी होती.

तीन मिनिटे भरायला फक्त तीन मिनिटेच लागतात पण ट्रेन इंडिकेटरवरची तीन मिनिटे लवकर भरत नाहीत. आज ती पटापट भरली. ट्रेन आली आणि आमच्या समोर उभी राहिली. मी ज्या बाकड्यावर बसून होतो तिथून हललोच नाही. रॉनने उठताना माझ्या पायावर हात मारला व उठण्याचा इशारा केला. मी रॉनला म्हणालो.

"तुला जायचे असेल तर जा, मला हि ट्रेन पकडायची नाही."

"तुला मध्येच वेड्याचा झटका तर येत नाही ना?" रॉन चिडून म्हणाला व पुढे काहीही न बोलता ट्रेनमध्ये चढला. परंतु ट्रेन सुटल्यावर सुद्धा मी चढत नाही हे पाहून तो धावत्या ट्रेनमधून उतरला व माझ्या समोर येऊन उभा राहिला आणि एकच शब्द म्हणाला,

"अनबिलीवेबल!"

"हू टोल्ड यू टू बिलिव?" त्याने कधीतरी बोललेले वाक्य मी त्यालाच बोलून दाखवले. त्यावर तो काही न बोलता दिसेनाश्या होणाऱ्या ट्रेनकडे बघत राहिला. मी मोबाईल काढून सोहाला मेसेज टाकला.

we missed d train

ट्रेन दिसेनाशी होताच रॉनने माझ्याकडे वळून विचारले "ट्रेन का सोडलीस मुर्खा?"

"कारण सोहाची इच्छा होती आपल्याला शेवटची ट्रेन मिळू नये"

"ती बोलली तुला असे?"

"तिने मेसेज केलेला की मी प्रार्थना करेन तुम्हाला ही ट्रेन मिळू नये म्हणून"

"दाखव काय मेसेज केलेला?"

रॉनला मी तो मेसेज दाखवणार इतक्यात माझा फोन घरघरला. तो सोहाचा होता.

"तुमची ट्रेन खरंच मिस झाली" तिने मला विचारले. झोपेमध्ये असल्यामुळे तिचा आवाज मला वेगळा वाटला व तो मला खूप रोमँटीक वाटला.

"हो. तुझी प्रार्थना ऐकली देवाने."

"पण मी अशी काही प्रार्थना केलीच नव्हती, मग आता काय करणार तुम्ही एवढा वेळ?"

"स्टेशनच्या बाहेर बसतो, प्लॅटफॉर्मवर पोलीस थांबून देत नाहीत असे मी ऐकलेय"

"आता पहिली ट्रेन किती वाजता आहे?"

"टाईम नाही माहीत पण तीन तासानंतर असते बहुतेक" मी बोलत असताना रॉनने माझ्या हातून फोन घेतला व तो सोहाशी बोलू लागला.

मिस सोहा मिनेझिस बरं झालं तू त्याला ट्रेनखाली झोपण्याची इच्छा नाही बोलून दाखवली.....

........काय झाले नाही ते विचार. समोर ट्रेन उभी असताना हा डुक्कर आत चढलाच नाही.

........मला माहीत आहे तू मजेमध्ये तो मेसेज केला. पण ह्यापुढे बोलताना विचार कर कारण हा माझ्या मावशीचा मुलगा थोडा वेडा आहे. तो तुझ्यासाठी काहीही करू शकतो.....

.......हा बरोबर. एक मिनिट, बोल त्याच्याशी.

त्याने माझ्याकडे फोन परत दिला. मी रागाने त्याच्याकडे पाहत फोन घेतला. मी सोहाकरता मुद्दाम ट्रेन सोडली हि गोष्ट तिला कळू द्यायची नव्हती. पण रॉन जे करतो ते सगळं विचारपूर्वक करतो. त्याने ती गोष्ट तिला सांगितली आणि ते माझ्या दृष्टीने बरं झालं.

"मॅक तुला काय गरज होती ट्रेन सोडायची? तुला वेड तर नाही लागले?"

"तू झोप सोहा आता." मी विषय तिथेच थांबवण्याचा प्रयत्न केला

"मला झोप लागणार नाही, मला बोलायचे आहे तुझ्याबरोबर"

"पण मी बोलत बसलो तर रॉन बिचारा कंटाळेल. एकतर तो माझ्यावर आधीच चिडला आहे."

“मग चॅटिंग तरी कर”

“हा, ते मी करू शकतो”

“एक गोष्ट सांगू मॅक, तू खरंच वेडा आहेस”

“मला माहीत आहे आणि मी वेडा होण्यामागचे कारण तू आहेस”

“ते कारण काहीही असो पण मला आजचा तुझा वेडेपणा खूप आवडला. तू खरंच माझ्यासाठी काहीही करू शकतोस.”

“पण तू संधी देत नाहीस”

“दिली एक संधी, एक गोष्ट अजून करशील माझ्यासाठी?”

“काय?”

“जर मी माझा थोडा वेळ तुला दिला तर तू तुझे संपूर्ण आयुष्य माझ्या जोडीला जगशिल?”

“सोहा मला कळले नाही तुला काय सांगायचे आहे?”

“मलाही त्यादिवशी कळले नव्हते ज्या वेळी तू मला प्रपोज करताना हे वाक्य म्हणाला होता. पण मला आता त्याचा अर्थ कळला आहे. माझा थोडा वेळच काय तर अख्खं आयुष्य तुझंच आहे. तू त्यादिवशी हेही म्हणाला होता, तू चमत्कारावर विश्वास ठेवतो. आता मी सुध्दा चमत्कारावर विश्वास ठेवू लागली आहे. ते तीन शब्द ऐकविण्यासाठी मी तुला खुप रडवले पण मी आज हृदयापासून तीन शब्द बोलतेय आय लव्ह यू”

तिने आय लव्ह यू म्हणताच मी लगेच रॉनकडे पाहिले, तो फोनवर बोलत होता. मग मी स्टेशन वरच्या इलेक्ट्रॉनिक घड्याळाकडे पाहिले. घड्याळामध्ये वेळ दाखवत होती 1:43. हा योगायोग समजायचा की चमत्कार

(ते तीन शब्द ऐकल्यानंतर मला झालेला आनंद मी शब्दातून प्रकट करू शकत नाही. त्यासाठी तुम्हाला मॅक बनावे लागेल, मॅक बनून तुम्हाला सोहावर खूप खूप खूप प्रेम करावे लागेल, तिच्यासाठी रडावे लागेल, रडत असताना तिला जोकर बनून हसवावे लागेल, जीवन जगत असताना प्रत्येक दिवशी मरावे लागेल आणि मरणातून पुन्हा उठून तिच्यावर खूप खूप खु.....प प्रेम करावे लागेल.)

मी चालत स्टेशनच्या बाहेर आलो. मी आजूबाजूला पाहिले, दोन तीन रिक्षावाले व सायकलवर चहा विकणारा मुलगा सोडल्यास बाकीचे आपापल्या रस्त्याला निघाले होते. मी रॉनच्या स्टाईलने आकाशाकडे पाहिले आणि माझा उजवा हात मस्तकाला लावला. पाय आपटून मी वरच्याला सॅल्यूट केले.

“हॅलो हॅलो कुठे गायब झालास मॅक?” सोहा सारखी हॅलो हॅलो ओरडत होती.

“ज्याने हा चमत्कार केला आहे त्याला थँक यू बोलत होतो.”

“हं, गूड. मला वाटले तिथेच झोपला कि काय.”

“सोहा, मला अख्ख्या जगाला ओरडून सांगायचे आहे.”

“काय सांगायचे आहे?”

“मी तुझ्यावर प्रेम करतो ते.”

“सांग, काय संगयाचे ते”

सोहाचा सांग बोलण्याचा अवकाश मी बेंबीच्या देठापासून जोरात ओरडलो “सोहा... आय लव्ह यू”

मला वाटलं होतं माझा आवाज तिथल्या तिथे घुमत राहील व माझे प्रतिध्वनी खूप वेळपर्यंत मला ऐकायला येतील, किंवा रस्त्यावरून जाणारे एखादे वाहन करकचून ब्रेक लागून थांबेल किंवा समोरच्या इमारतीच्या काचा खळकन फुटतील. पण तसे काही घडले नाही. फक्त आजूबाजूच्या परिसरातील सर्व लोकांनी आमच्याकडे एकाच वेळी पाहिले. रॉनने लगेच हॅलो हॅलो करीत मोबाईलवर बोलण्याचा बहाणा केला, जणू तो मला ओळखतच नव्हता. सोहाने तो आवाज ऐकला व मला म्हणाली,

“सुपर्ब, वन्स मोअर.”

“आता ओरडलो तर रिक्षावाले धरून मारतील मला” मी तिला समजावण्याचा प्रयत्न केला.

ती फक्त हसली व म्हणाली तू अल्लाउद्दिनच्या दिव्यातला राक्षस आहेस. माझ्या तोंडातून काही बाहेर पडण्याचा अवकाश तू ते करून दाखवतोस. चल आता फोन ठेव, रॉन कंटाळेल.”

“जो हुकुम मेरे आका.” बोलून मी थांबलो मग पुन्हा हळूच तिचे नाव उच्चारले “सोहा”

“काय?”

“आय लव्ह यू”

“किती वेळा बोलणार आहेस अजून?”

“माझे उत्तर ते नव्हते.”

“ओके राक्षसा, आय लव्ह यू टू”

“थँक यू सो मच सोहा, गुडनाईट.”

“तुम्हाला गुडनाईट करून काय फायदा, एन्जोय युअर नाईट. सकाळी पोहचल्यावर मेसेज करायला विसरू नकोस आणि रॉनला आपल्यातर्फे सॉरी सांग.”

“जो हुकुम मेरे आका” बोलून मी फोन बंद केला व एकदम आनंदाच्या भरात रॉनकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर राग होता पण कसलीतरी उत्सुकता होती.

मी त्याच्याकडे बघत जवळ जवळ किंचाळलो रॉन आय डीड इट, आय डीड इट रॉन. सोहा मला आज आय लव्ह यू बोलली.”

“तिने बोललेले मी ऐकले नाही पण तू तिला आय लव्ह यू म्हणाला ते बहिऱ्याने पण ऐकले असेल.”

“हे सर्व तुझ्यामुळे झाले रॉन, यू आर माय बेस्ट बडी. आय गॉट माय लव्ह.”

“सो आय ॲम नॉट युअर लव्ह सो फार?”

“कोणी सांगितले, इफ सोह इज माय लव्ह, यू आर माय लाईफ. आय लव्ह यू टू.”

“आता ओरड तेव्हासारखं, रॉन आय लव्ह यू करून.”

त्यात काय असे बोलून मी पुन्हा जोरात ओरडलो “रॉन... आय लव्ह यू.”

"आय लव्ह यू टू" रॉनही माझ्या पाठोपाठ ओरडला. पुन्हा सगळ्यांच्या नजरा आमच्याकडे वळल्या. फुटपाथवर झोपलेला कोणतरी भिकारीही जोरात ओरडला "ए कौन चिल्ला राहा है वो?" पण आम्ही त्याकडे लक्ष देले नाही. बघणाऱ्याला नक्कीच वाटले असेल आम्ही वेडे आहोत पण वाटायचे काय त्यात, ते तर आम्ही होतोच.

ज्यादिवशी सोहा तुला 'हा' सांगेल त्याच्या दुसऱ्या दिवशी मी ब्रिटनीला प्रपोज करणार, असे रॉनने मला सांगितले होते. रॉन तिला लाईक करतो ही गोष्ट मी आधीच ब्रिटनीच्या कानावर घातली होती. तीसुद्धा रॉनला लाईक करीत असावी कारण रॉनचे नाव काढताच ती काही न बोलता फक्त लाजली होती. ठरल्याप्रमाणे रॉनने कालच तिला फोनवर प्रपोज केले होते व तिने रॉनला होकार दिला होता. आज कॉलेजला फ्रेन्डशीपडे होता, पण आम्ही तो साजरा केला नाही. कारण आमच्यासाठी आज वेलंटाईन डे होता. किनारा हॉटेलची फॅमिली रूम आमच्याकरता माझ्या स्वप्नातले जग होते. सोहा माझ्या बाजूला थोडंसं अंतर ठेवून बसली होती. आमच्या दोघांमध्ये असलेलं ते चार बोटांच अंतरही मला खूप मोठं वाटत होतं. समोर बसलेल्या रॉन व ब्रिटनी ह्या दोघांमधलं ते अंतर कधीच मिटलं होतं. हातात हात घेऊन ते आपल्याच गोष्टीत रमून गेले होते.

"नेलपोलीश खूप छान वाटते तुझ्या बोटांना" मी सोहच्या बोटांकडे पाहत तिला म्हटले.

"थँक यू."

"आणि तुझी नखं पण खूप छान आहेत."

"थँक यू" ती पुन्हा म्हणाली."

"आणि तुझी बोटं पण खूप छान आहेत."

पण ह्यावेळी थँक यू न बोलता तिने मला प्रश्न केला "माझा हात पण खूप छान असेल ना?"

"माहीत नाही. तो पकडल्याशिवाय मी सांगू शकत नाही."

गालातच हसून, काहीही न बोलता तिने तिचा हात माझ्यापुढे सरकवला. मी माझ्या थरथरत्या हाताने तो गच्च पकडला. इतका गच्च कि जगातील कुठलीही शक्ती आमचे हात वेगळे करू शकत नव्हती. मी तिचा हात पकडला तेव्हा एक क्षण रॉनचे लक्ष आमच्याकडे गेले. त्याने माझ्याकडे बघून स्माईल केले व समोर असलेले कोकचे ग्लास उचलून मला चीअर्स केले. त्या दोघांनीही त्यांचे ग्लास उचलून आमच्या ग्लासला लावले मग मी व रॉनने एकत्रच आकाशाकडे पाहून रॉनच्या बडीला चीअर्स केले. हा काय विचित्र प्रकार आहे हे जाणण्याच्या हेतूने त्या दोघींनी आमच्याकडे पाहिले पण त्यांनी काही विचारले नाही. सोहाचा हात तसाच पकडून ठेवत मी खिडकीतून बाहेर नजर टाकली. समोर अथांग सागर पसरला होता. प्रेमी युगुलांना समुद्राचे आकर्षण का असते ते मला आज समजले.

"तुला त्या मुलीने हा सांगितले ना?" मॉमने एके दिवशी कॉफी पिताना मला प्रश्न केला.

हो मॉम, पण तुला कसे माहीत?"

नऊ महिने पोटात वाढवले आहे तुला, तुझ्या प्रत्येक सुखदुखाची भागीदार आहे मी. तू नाही सांगितले म्हणून काही कळणार नाही मला?"

तुझ्या वाढदिवशी तिला तुझ्यासमोर उभी करून सरप्राईज देणार होतो. पण त्या आधीच तुला समजले." मी नाराज होत म्हणालो.

त्यात काय विशेष. मला तेवढाच आनंद काल झाला जेव्हा रॉनने मला सांगितले. तू त्याला आधी सांगायला हवे होते, मला सांगू नको म्हणून. काही फरक पडत नाही, गिफ्ट जरी आधी मिळाले असले तरी ते मी माझ्या वाढदिवशीच ओपन करीन. तू वाढदिवशी घरी बोलाव तिला.''

चालेल, मी जेवायला बोलावतो. तुला माहित आहे मॉम, रॉनसुधा प्रेमात पडला आहे. ब्रिटनी तिचे नाव. योगायोग म्हणजे सोहा आणि त्या दोघी चांगल्या मैत्रिणी आहेत.''

त्या मुलाचा काही भरवसा नाही, त्याचे लग्न होईल तेव्हा मला पटेल.''

रॉन आता खूप सुधारला आहे तो आता कुठल्याही मुलीला फसवणार नाही, त्याने मला प्रॉमिस केले आहे.''

त्या दिवशी रॉनला मारायला कोण आलेले?'' मॉमने मला प्रश्न केला.

तुला कोणी सांगितले?''

मावशी बोलली मला.''

आमच्या कॉलेजला एक डायना म्हणून मिस आहे तिचा नवरा आणि आपल्या गावातला मार्शल. मारायला नाही आले तक्रार करायला आले होते. पण तो मार्शल रॉनला मारायची धमकी द्यायला लागला, तसा मी चिडलो. मावशीने पण खूप सुनावले त्यांना.''

''मग?''

''मग काय, ते दुसऱ्या दिवशी कॉलेजला पण आले होते प्रिन्सिपलला भेटायला. पण डायना मिसने दोघांना परत पाठवले.''

''मावशी म्हणत होती, रॉन आणि तिच्यामध्ये काहीतरी असले पाहिजे त्याशिवाय रॉन असा मेसेज पाठवणार नाही.''

''तो विषय सोडून दे मॉम. मला शनिवारी दोन हजार रूपये हवे आहेत. आम्ही पिकनिकला जाणार आहोत.''

''सोहा पण येणार आहे?''

''नाही. आपल्या गावातील पोरं आहेत.''

''तुमच्या पाया पडते मी. गावातल्या मुलांबरोबर मी तुला कुठेही पाठवणार नाही. तुम्ही सगळे एकत्र गेले म्हणजे काही तरी लफडं करून येणार. मागच्या वेळी पिकनिकला गेले आणि आले मारामारी करून. दोन वर्षाआधी लग्नामध्ये काय कमी तमाशा केला होता तुम्ही? दुसरा कोण मारामारी करायला मिळाला नाही कि लागता स्वतःच एकमेकांना मारायला....''

मॉमच्या तोंडाचा पट्टा चालू झाला होता. तो काही आता लवकर थांबणार नव्हता. मला आता तेथून पाय काढणे भाग होते मी मॉमला म्हणालो.

''आता सगळे सुधारले आहेत मॉम. आता नाही करणार कोण मारामारी.''

''मला काही विचारू नको डॅडी संमत्ती देत असतील तर जा.''

''चालेल मी डॅडींना संध्याकाळी विचारेन पण तू त्यांना काही भलते सलते भरवू नको, कळलं ना?''

''मी तरी सांगेन पाठवू नका आणि मावशीला पण मी फोन करून रॉनला पाठवायला बंद करते.''

"तू काय करणार ते कर, आम्ही जाणार म्हणजे जाणार. तुम्ही पैसे दिले नाहीत तरी चालतील,

आम्ही फर्नांडीसकडून घेऊ. मी जातोय कॉलेजला." इतकं बोलून मी खुर्चीवरून उठलो व बॅग घेऊन रॉनच्या घराकडे निघालो. मला मॉमचा अजिबात राग आला नव्हता तरी मी मुद्दामहून तसे बोललो. मला माहीत होते, कितीही झाले तरी ती मला कधी नाराज करणार नाही.

मॉमच्या दृष्टीने विचार केल्यास तिचे म्हणणे अगदी योग्य होते. गावातील मुले बोलली की ती काही प्रमाणात रावडी असतातच, पण आमच्या गावाच्या बाबतीत हे प्रमाण जरा जास्तंच होते. तसे आमचे पराक्रम खूप होते, पण दोन वर्षापूर्वी लग्नामध्ये केलेला पराक्रम जरा मोठाच होता. तो प्रसंग मी अजून विसरलो नव्हतो आणि आज सकाळीच मॉमने त्याची आठवण करून दिली होती. रॉनच्या बाईकवर बसून कॉलेजला जाता जाता त्या प्रसंगाची भयानक चित्रे माझ्या डोळ्यासमोर उभी राहिली...

दोन वर्षाआधी आम्ही वसईतील एका गावात लग्नासाठी गेलो होतो. लग्न जरी रविवारी असले तरी शनिवारी संध्याकाळी आम्हाला आग्रहाचे आमंत्रण होते. मी, रॉन व ख्रिस आम्ही आधी पोहचलो व आमच्या आवडत्या कामाला सुरुवात केली. जेसन व गावातील अजून दोन मुले फ्रँक व स्टीफन हे आम्हाला नंतर जॉईन झाले. आम्ही सहाजण बार काउन्टरजवळ पीत उभे होतो. तेव्हा मित्राने आम्हाला नाचण्याची विनंती केली. पिणं झाल्यावर नाचण्यासाठी आम्ही मंडपात गेलो. तिकडचे चित्र जरा वेगळे होते. ज्या गावात लग्न होते त्या गावातील वीस पंचवीस मुलं आधीच त्या ठिकाणी नाचत होती. त्यांचा नाच जरा डोक्यात शिरणाराच होता. कारण ती बाहेरच्या कुणाला नाचू देत नव्हती. उगाच काही matter नको म्हणून न नाचता आम्ही चुपचाप जेवणाकडे मोर्चा वळवला.

ख्रिसला नाचण्याची खूप आवड होती, तो सारखा नाचण्यासाठी आग्रह करीत होता. पण आम्ही त्याला नकार दिला. ज्या ठिकाणी डी. जे. ठेवला होता त्याच्या आसपास भरपूर जागा शिल्लक होती. ख्रिसने आम्हाला त्या ठिकाणी नाचण्यास सांगितले. ते आम्हाला योग्य वाटले. आम्ही सहाही जण त्या ठिकाणी नाचू लागलो. आम्हाला तिथे नाचताना बघून ज्यांना नाचायची इच्छा होती असे काही लोक आमच्यात सामील झाले. त्यामध्ये बहुतेक मुलीच होत्या. डी. जे. ख्रिसच्या ओळखीतला असल्याने आम्ही सांगितलेली बहुतेक गाणी त्या ठिकाणी वाजत होती. आपल्या गावातल्या मुली भलत्याच मुलांबरोबर नाचाव्यात ही गोष्ट कुणालाही आवडणार नाही आणि नेमकं तेच झालं. मघापासून मंडपामध्ये धुमाकूळ घातलेली काही मुलं आमच्या सभोवताली गोळा झाली. नाचण्याचे सोडून ती मुलं आमच्यावर कमेंट्स करू लागली. पण आम्ही त्याकडे लक्ष दिले नाही. मुलींनी मंडप रिकामा बघून मंडपाकडे मोर्चा वळवला. पण ती मुलं त्याठिकाणीच उभी राहिली. आम्ही त्याकडे लक्ष न देता नाचणे चालूच ठेवले. इतक्यात पाण्याचे काही थेंब आमच्या अंगावर पडले. ते पाणी त्या मुलांपैकी कोणीतरी उडवले होते. पाणी अंगावर पडताच आम्ही नाचणे थांबवले. ती मुले आमच्याकडे पाहून मोठ्याने हसत होती. रॉनने डी.जे. कडे जात डी.जे. बंद करण्याची सूचना केली. त्या डी.जे. ऑपरेटरने ती लगेच अंमलात आणली. रॉनने मग माईक हातात घेतला व सुचना केली...

आज आम्ही तुमच्यासमोर एक डान्स सादर करीत आहोत, सर्वांनी त्याचा आनंद घ्यावा. मग त्याने डी.जे ऑपरेटरला ढगाला लागली कळं पाणी थेंब थेंब गळं हे गाणं लावण्याची सूचना केली.

डी.जे. पुन्हा सुरु झाला व आम्ही सहाही जण पुन्हा नाचू लागलो. सगळे लोक आमच्याकडे कुतूहलाने पाहू लागले. त्या मुलांना कदाचीत ते खूप अपमानास्पद वाटलं असेल, त्यांतील एकाने जाऊन भांडे भरून पाणी आणले व ते आमच्या अंगावर टाकले. त्याने वापरलेले भांडे जेवणाचे होते व ते धुतलेले नव्हते. ते घाण पाणी अंगावर पडताच जेसन खवळला. कसलाही विचार न करता तो त्या मुलांवर तुटून पडला. असा हल्ला आपल्यावर होऊ शकतो हा विचार त्या मुलाने स्वप्नातही केला नसेल. जेसन पाठोपाठ आम्ही सुद्धा त्या मुलाच्या अंगावर चालून गेलो. आमचे ते आक्रमक रूप बघून कधीपासून वाघ बनू पाहणाऱ्या मुलांनी आपल्या शेपट्या दोन तंगड्यात घातल्या व तेथून पोबारा केला. ज्या मित्राच्या घरी

आम्ही गेलो होतो त्याच्या कुटुंबीयांनी मध्यस्थी करून आमचे भांडण मिटवले व आम्हाला जेवण्याची विनंती केली. आम्ही त्या विनंतीला मान देऊन जेवायला गेलो. ज्या मुलाने पाणी टाकले होते त्या मुलाला जेवायची गरज नव्हती कारण त्याने भरपूर मार खाल्ला होता. बाकीची मुलं काही बोलत नसली तरी त्यांचा पुढच्या हालचाली मात्र सुरु झाल्या होत्या.

काही झालेच नाही ह्या थाटात आम्ही ताट भरले व जेवायला बसलो. काही क्षणातच बाहेर आम्हाला कसलातरी गोंगाट ऐकायला आला. आम्ही पाहिले तर गावातली चार पाच मोठी माणसे आम्हाला मारण्यासाठी येत होती. एक दोघांच्या हातात दांडेही होते. आम्ही त्यंना पाहिले पण आमच्यातला एकही जण खुर्चीतून उठला नाही की जेवायचा थांबला नाही. ती माणसे आमच्यापर्यंत पोहचू शकली नाहीत कारण लग्नाघराच्या बायका हात जोडून त्यांना विनवणी करीत होत्या. लग्नाच्या मंडपात कुठल्याही प्रकारचे विघ्न नको म्हणून त्यांनी ती विनवणी ऐकली असेल कदाचित. त्यांचातला एकजण फक्त जोरात गर्जना करीत म्हणाला.

"ती कोण मुलं आहेत ते आम्हाला फक्त बघायाचे आहे."

त्याचे वाक्य संपायचा अवकाश आम्ही एकापाठोपाठ एक सहाही जण उभे राहिलो. "आम्ही आहोत ती मुलं" मी व आमच्यातले दोघे तिघे बेडरपणे बोलले. एरवी छोट्या छोट्या गोष्टीवरून माझ्या मनामध्ये साचणाऱ्या भीतीचा त्यावेळी काही लवलेशही नव्हता. आपली चूक नसते तेव्हा माणूस कोणालाही घाबरत नसतो हे मला त्यावेळी पटले.

"तुमच्यातला एक जणही आज घरी जाणार नाही" असे बोलत तो माणूस व ते सर्व दांडेकर निघून गेले. आमच्यावर आलेले संकट आम्हाला माहीत असूनही आम्ही पुन्हा जेवायला बसलो. आजूबाजूच्या लोकांना आमचे असे बिनधास्त वागणे खूप विचित्र वाटत असावे, कारण ते त्यांचे जेवण सोडून आमच्याकडे पाहत होते. आमच्यातले कुणी काही बोलत नव्हते, सगळे बिनधास्त जेवत होतो.

जेवण आटोपले व आम्ही घरी जाण्यासाठी बाईकवर बसलो. तशी मित्राची आई पुढे येत म्हणाली

"त्या लोकांनी बाहेर तुमच्यासाठी फिल्डिंग लावली आहे. तुम्ही प्लीज जाऊ नका, इथेच थांबा."

"आमची काळजी करू नका, ते आम्हाला एकदा मारतील पण त्यानंतर आम्ही त्यांना दहा वेळा त्यांचा घरात घुसून मारू." जेसन तिच्याकडे पाहत म्हणाला व त्याने बाईकला किक मारली. एकापाठोपाठ एक अशा आमच्या सगळयांच्या गाड्या गावातल्या वेशीच्या बाहेर पडल्या. रॉन सगळयात पहिला होता व रॉनच्या मागे मी बसलो होतो. रॉनने त्यांना समोर पाहताच तो मला म्हणाला,

"मी बाईक स्लो केली की तू लगेच उडी मार आणि सरळ सुरुवात कर. तू पहिला हात उचलल्यावर समोरचा आपोआप थंड पडणार."

'असा तसा मार खायचाच असेल तर दोन तीन मारल्याचे तरी समाधान.' मी मनातच म्हणालो व घड्याळ काढून खिशात घातले. रॉनने बाईक स्लो करताच मी लगेच उतरलो. इतक्यात एका माणसाने समोर येत रॉनची बाईक थांबवली व त्याने रॉनला आईवरून काही तरी शिवी दिली. रॉन बाईक स्टँडला लावत चीत्त्याच्या चपळाईने खाली उतरला व काही सेकंदाचा अवकाश रॉनचा हात त्या माणसाच्या तोंडावर आदळला व आदळतच राहिला. रॉनला मारण्यासाठी मग बाजूच्या माणसाने त्याच्यावर चाल करण्याचा प्रयत्न केला पण मी लगेच रॉनला मारण्यासाठी गेलेल्या माणसावर चालून गेलो. त्याक्षणी आम्ही जर चपळपणा दाखवला नसता तर कादाचित चित्र काही वेगळेच असते. जेसन तर जो मिळेल त्याला मारत सुटला. आमच्या हल्ल्याने ते इतके गांगरून गेले की आम्हाला मारायला आणलेल्या दांड्याचा चोप ख्रिस सोडता त्यांनाच जास्त भेटला. ख्रिसच्या पाठीवर कुणीतरी दांड्याने प्रहार केला व जेसनने ते नेमके बघितले. पुढे त्या माणसाचे

काय झाले ते सांगण्याची गरज नाही. आम्ही त्या रात्री घरी परतलो ते विजयी होऊनच, पण त्या विजयाचा आनंद एक दिवसही टिकला नाही...

दुसऱ्या दिवशी रविवार होता. सकाळी चर्चला जाऊन आल्यानंतर मी मॅच बघत घरी बसलो होतो. इतक्यात रॉनने फोन करून कपडे बदलून मला त्याचा घरी यायला सांगितले. 'कुठे जायचे आहे?' ह्या माझ्या प्रश्नावर तो काही बोलला नाही. काहीतरी तातडीचे काम असेल म्हणून मी फटाफट चेंज करून  लगेच त्याच्या घरी पोहचलो. त्याचे घर गावातच असल्याने मला पोहचायला पाच मिनिटंही लागली नाहीत. तो माझीच वाट पाहत बाईकवर बसला होता. मी येताच त्याने मला बसण्यास सांगितले. 'कुठे जायचे आहे?' ह्या मी दुसऱ्यांदा विचारलेल्या प्रश्नावर त्याने फक्त 'सांगतो तुला' एवढेच उत्तर दिले. मी त्याला पुन्हा तोच प्रश्न केला.

"कुठे चाललो आहोत आपण रॉन?"

"पोलीस स्टेशनला."

"पोलीस स्टेशनला कशाला?" मी काहीशा आश्चर्याने त्याला विचारले.

"काल आपण डब्लू डब्लू एफ ची चँपियनशिप जिंकलो ना, सत्कार आहे आपला कामिश्नरच्या हस्ते."

"म्हणजे?"

"म्हणजे आपल्या नावावर केस टाकली आहे त्या लोकांनी, ख्रीसला सकाळीच पोलीस उचलून घेऊन गेले आहेत. आपल्याला अकरापर्यंत हजर राहायला सांगितले आहे."

'ओ माय गॉड' मी स्वतःशीच बोललो. पोलीस स्टेशनचे नाव ऐकताच मला दरदरून घाम फुटला.

"बाकी लोक कुठे आहेत?" मी रॉनला प्रश्न केला

"जेसनला मी फोन केलेला तो फ्रँक व स्टीफनला घेऊन येईल. तो डुक्कर माझे अभिनंदन करायला लागलेला"

"कोण अभिनंदन करायला लागलेला?"

"जेसन. त्याला अनुभव होताच पोलीस स्टेशनचा, आता आपणसुधा त्याचे भागीदार झाले म्हणून खुश होता."

"वाट लागली यार आता. गावात जर कळाले तर आपण गेले बाराच्या भावाला." मी एकदम चिंतेच्या सुरात म्हणालो.

"गावात कळू दे, पण घरी कळता कामा नये. नाहीतर पाठ फुटली म्हणून समज."

ती फुटणार होतीच कारण जेव्हा आम्ही पोलीस स्टेशनला पोहचलो तेव्हा रॉनच्या बाईकच्या समोर आडवा आलेला माणूस व ख्रिसच्या पाठीत दांड्याने वार करणारा माणूस दोघे पोलिसासमोर बसले होते. ते तावातावाने त्या पोलिसाला सगळं तिखट मीठ लावून सांगत होते. एक गोष्ट आमच्या विरोधात होती. त्यांनी खाल्लेला मार त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होता. रात्रीच्या अंधारात आम्हाला समजलेच नव्हते आम्ही एवढा मोठा पराक्रम केला आहे तो. ख्रिस बाकावर चुपचाप बसून आमचीच येण्याची वाट पाहत होता. आम्ही येताच तो खूप खुश झाला. मानवी स्वभावाचा एक गुणधर्म आहे, तो संकटात असताना त्याला जर कोण भागीदार मिळाला तर त्यावरील दडपण अर्ध्या पटीने कमी होते. आमचे दडपण अजून कमी करायला आमचे तिघे भागीदार यायचे होतेच, ते लवकरच दाखल झाले.

"ती लोकं सांगताहेत आपण त्यांची सोन्याची चैन चोरली आहे." ख्रिस कुजबुजला.

"आपण काय चोर वाटलो का त्यांना?" मी रागाने त्यांच्याकडे पाहत कुजबुजलो.

"पोलीस केस करणार माहीत असते तर साल्यांना अजून तुडवले असते." जेसन दात ओठ खात म्हणाला. त्याचा आवाज कदाचित पोलिसाने ऐकला असावा. तो जेसनवर अस्सल खाकी आवाजात ओरडला.

"काय रे ए, खाऊन खाऊन चरबी चढली का तुला?"

मी विचार केला जणूकाही हा पोलिसच खायला घालतो जेसनला. जेसन चुपचाप काही न बोलता त्याच्या तोंडाकडे बघत राहिला. मग त्या पोलिसाने दुसऱ्या एका पोलिसाला हाक मारली व सांगितले.

"त्यांना आतमध्ये घेऊन जा आणि विचारा चैन कुठे आहे ती."

"कसली चैन साहेब चैनीबद्दल आम्हाला काही माहीत नाही." जेसन न घाबरता म्हणाला. माझ्या पोटात मात्र मोठ्ठा खड्डा पडला होता. काही बोलायचे झाल्यास माझा आवाजच निघाला नसता. रॉनही ह्या प्रकाराने बावरला होता. तोही जेसनला साथ देत म्हणाला.

"आम्ही मारामारी केली हे खरं आहे साहेब पण चैनबद्दल आम्हाला काही माहीत नाही. चांगल्या घरातील मुलं आहोत आम्ही, चोर नाहीत."

"चोर नाहीत ना मग चुपचाप सांगा कुठे लपवलीय ती चैन"

"आम्ही खरंच नाही घेतली साहेब, देवा शप्पथ सांगतो फ्रँक रडवेला चेहरा करून म्हणाला. त्यावर आमच्यावर केस करणारा तो माणूस पोलिसांना म्हणाला

"तुम्हीच बघा काय करायचे ते पाटील साहेब. माझे घड्याळ गेले ते जाऊ दे. पण माझी तीन तोळ्याची चैन होती." चैन तीन तोळ्याची होती कि तीन ग्रॅमची ते त्या माणसाला आणि देवालाच माहीत. पण ह्यावेळी देवसुद्धा काही करू शकत नव्हता.

"मोठे भाई बनता ना तुम्ही, कुठल्या गँगसाठी काम करता?" त्या पोलिसाने सवाल केला

"गँगसाठी काम केले असते तर इथे यायची गरजच पडली नसती." रॉन त्या पोलिसाच्या डोळ्यात डोळे घालत म्हणाला.

"काय म्हणालास रे - - -" त्या पोलिसाने रॉनला वेश्या पुरवणाऱ्या माणसाची पदवी देऊन टाकली.

"शिवी नका देऊ साहेब मी खरं तेच बोलतोय. आम्ही चैन घेतली नाही हे तुम्हालाही माहीत आहे. पण फक्त युनिफॉर्मच्या जोरावर तुम्ही आमच्यावर हक्क गाजवाताय ...." रॉन अजून पुढे काही बोलणार तोच रॉनच्या गालावर त्या पोलिसाच हात पडला. मग तो पोलीस ओरडत म्हणाला,

"युनिफॉर्मचा जोर बघायचा आहे ना तुम्हाला, आता दाखवतो." इतकं बोलून त्याने हवालदाराला ऑर्डर सोडली.

"बाजूच्या रुममध्ये घे ह्यांना."

बाजूची रूम एकदम व्ही.आय.पी. होती. फक्त चार भिंती. त्या भिंतीला टांगवलेला एक पट्टा व एक चाबूक. कोपऱ्यात स्टूलवर ठेवलेले पाण्याचे मडके व त्यावर एक स्टीलचा ग्लास, बस्स. आम्हाला त्या रुममध्ये लाइनशिर उभे राहायला सांगितले. माझे हातपाय लटलट कापत होते. हा सर्व प्रकार मी टीव्ही वर पाहिला होता. टीव्ही वर पाहतानाही पोलिसांच्या माराबद्दल माझ्या मनात भीती निर्माण होई. आणि आज प्रत्यक्ष मी त्या गोष्टीचा अनुभव घेत होतो. त्या हवालदाराने भिंतीला टांगवलेला तो पट्टा काढला व त्या पट्ट्याने आमच्या हातावर पूर्ण ताकदीनिशी वार केले. तो पट्टा

हातावर बसताच मी 'आईचा घो' करून जोरात ओरडलो. त्याच्या वेदना माझ्या मस्तकापर्यंत गेल्या व काही क्षणातच माझ्या हाताच्या संवेदनाच नष्ट झाल्या. त्यानंतर किती फटके मारले ह्याचे मला भान नव्हते. सर्वांची परिस्थिती माझ्यासारखीच होती. मग त्या पांडूने तेच हात जमिनीवर आपटायला सांगितले. 'हा काय विचित्र प्रकार आहे' मी विचार केला. पण तो प्रकार फारच भयंकर होता. आमच्या सगळयांच्या डोळयात पाणी आले इतक्या असह्य वेदना आम्हाला त्यावेळी झाल्या. वाटले चोरी केली नाही तरी ओरडून सांगावे आम्ही चोर आहोत म्हणून. पण आम्ही इतकेही कायर नव्हतो. आम्हाला आतच ठेवून तो पांडू बाहेर निघून गेला.

थोड्या वेळाने रॉनच्या कानाखाली मारलेला तो पोलीस कसलीतरी फाईल घेऊन आत आला. आम्ही खाली भिंतीला टेकून बसलो होतो. कुणी काही बोलत नव्हते. आत येत तो रॉनकडे पाहत म्हणाला, "बघितली ना युनिफॉर्मची ताकद. घाबरू नका, हा फक्त नाश्ता होता. जेवण अजून बाकी आहे तुमचे."

मी रॉनकडे पाहिले तो एकदम तुच्छतेने त्या पोलिसाकडे पाहत दातांमध्ये काही अटकलेले जिभेने काढत होता. जणूकाही खरंच त्याने नाश्ता केला होता.

"बोला, ह्या अगोदर चोरलेल्या मालाचे काय केले?" फाईलमध्ये डोकं घालत त्याने दोन तीन ठिकाणच्या चोऱ्याविषयी आम्हाला विचारले.

"वाटलेलेच ह्या आधीचे पण गुन्हे आमच्यावर लादले जातील. तुम्हाला किती मारायचे आहे ते मारा पण आम्ही घाबरून खोटा आळ आमच्यावर घेणार नाहीत." जेसन सरळ सोटपणे त्याला म्हणाला.

"तुमच्यावर अशी केस लावतो, ह्या फाईलमध्ये नसलेले गुन्हे पण तुम्ही मान्य कराल." इतकं बोलून तो निघून गेला

आम्ही सगळ्यांनी हताशपणे एकमेकांकडे पाहिले. खूप वेळ असाच निघून गेला. मला खूप तहान लागली होती. समोर असलेल्या मडक्याकडे मी गेलो व ग्लास उचलण्याचा प्रयत्न केला. पण हातामध्ये तेवढेही सामर्थ्य राहिले नव्हते. जेमेतेम पाणी पिऊन मी जागेवर बसलो तोच घरून फोन आला. मी खिशातून मोबाईल काढून डॅडीला सगळी हकीकत कथन केली. ते चिडले ओरडले पण शेवटी मला धीर देत म्हणाले. तुम्ही घाबरू नका आम्ही पोहचतोय तिकडे. पण ते यायच्या आधीच ख्रिसचे वडील त्या ठिकाणी येऊन पोहचले होते. ख्रिसने त्यांना सकाळीच ह्याविषयी कल्पना दिली होती. परंतु कामानिमित्त ते बाहेर गेले होते. त्यांना यायला थोडा उशीर झाला होता. ते आले ते कुठल्यातरी राजकीय पुढाऱ्याला घेऊनच. ते येताच त्यांनी ते मॅटर तिकडल्या तिकडे मिटवून आम्हाला बाहेर काढले. काही वेळापूर्वी वाघाचे कातडे ओढून वाघ बनू पाहणारा कोल्हा आता मात्र आमच्याशी गोडी गुलाबीने बोलू लागला. त्या पोलिसाचा अचानक गोड बोलण्याचा अर्थ आम्हाला लगेच समजला. मनात प्रचंड राग असूनही मला त्याच्या लाचार वागण्याचे हसू आले. विचार केला हिंदी मुव्हीमध्ये दाखवतात तसा एखादा सच्चा आणि इनामदार पोलीसवाला मला बघायचा आहे, त्या माणसाचे पाय सुद्धा धुवायला मी मागे पुढे बघणार नाही.

बाहेर येणार इतक्यात डॅडी आणि मावसा दोघेसुद्धा गाडी पार्क करताना आम्हाला दिसले. त्यांनी आम्हाला पाहिले व आम्ही उभे होतो त्याठिकाणी ते पोहचले. आम्ही आत असताना घडलेली हकीकत ख्रिसचे वडील आम्हाला सांगत होते. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे आमच्यावरील केस मागे घेण्यासाठी त्या माणसाला पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी लागली होती. त्याव्यतिरिक्त दहा हजार रुपये पोलिसांनी घेतले होते.

ते ऐकून ख्रिस माझ्या कानात कुजबुजला "तिकडे नाचल्यामुळे एवढं सगळं होणार आहे हे आधी माहीत असतं तर साठ हजारात डी.जे. विकत घेऊन मी घरी रोज नाचलो असतो."

मला आलेले हसू दाबीत मी त्याला चूप बसायला सांगितले

"म्हणजे प्रत्येकी दहा हजार तुम्हाला द्यायचे?" माझ्या डॅडींनी ख्रिसच्या वडिलांना प्रश्न केला.

"पैशाचे टेन्शन घेऊ नका डिसोजा. जेव्हा गरज लागेल तेव्हा घेईन तुमच्याकडून. नाहीतर एक काम करा, पुढच्या केसला तुम्ही भरा." ख्रीसचे वडील गमतीने म्हणाले. त्यावर तेथील गंभीर वातावरण एकदम प्रसन्न झाले.

"म्हणजे अजून मारामारी करायची बाकी आहे का?" रॉनकडे पाहत मावशाने विचारले.

"मारामाऱ्या आपण काय कमी केल्या आहेत, आपली मुलं आपल्यावर नाही जाणार तर कोणावर जाणार? पण तेव्हाचा काळ वेगळा होता. इतक्या वेळा मारामारी केली पण एकदाही पोलीस स्टेशनची पायरी आपण चढलो नाही." ख्रिसचे वडील मोठ्या शानमध्ये म्हणाले.

"तेच आहे ना पोलिसांना पैसे द्यायचे ते वेगळे आणि बदनामी होते ती वेगळी." रॉनचे वडील पुन्हा म्हणाले.

"बदनामीचे काय घेऊन बसला आहेस डिसिल्वा, बदनामितच यश आहे." ख्रिसचे वडील हसत म्हणाले.

"ते मात्र खरं बोललात तुम्ही." इतकं बोलून डॅडींनी त्यांचा निरोप घेतला व जो तो आपापल्या रस्त्याने निघाला.

जाताना मी डॅडीच्या मागे बसलो होतो. हात दुखत असल्यामुळे रॉनला गाडी चालवायला अडचण येत होती म्हणून बाईक त्याच्या वडिलांकडे देऊन तोही मागे बसला होता. घरी जाता जाता माझ्या मनात वेगळेच विचार चालू होते. 'त्या माणसाने पन्नास हजार घेतले ते ठीक आहे पण पोलिसांनी दहा हजार कशासाठी घेतले? आमच्या हातावर पाच फटके मारले त्यासाठी की रॉनच्या कानाखाली मारली त्यासाठी? ही मग निव्वळ दादागिरीच झाली. ह्या अशा भ्रष्टाचारी लोकांमुळे देशाची वाईट अवस्था झाली आहे. खाणारा पैसे खात राहतो, आपल्यासारखा सामान्य माणूस पैसे नाही दिले तर मार खात राहतो. आज ख्रिसच्या वडिलांकडे पैसे होते त्यांनी ते फेकले. देणे वेगळे असते आणि फेकने वेगळे असते. मी तरी सांगेन त्यांनी ते फेकले. पण हेच साठ हजार द्यायची वेळ माझ्या डॅडींवर आली असती तर? साठ हजार कमावण्यासाठी साठ वेळा मुंबईला जावे लागते त्यांना. ते पैसे फेकू शकत नाहीत त्यांना ते मन मारून द्यावे लागले असते. आम्ही चोरी केली नव्हती असे ओरडून सांगूनही मार तर खावा लागलाच आणि वर पैसे भरावे लागले. आणि आज चोरी करणारे खरे चोर मात्र खुले आमपणे फिरत आहेत. कधी पकडले जातही असतील. पण आज आम्ही दहा हजार दिले तसे दहा हजार देऊन व्ही.आय.पी रुमच्या बाहेर. मला रॉनचे शब्द अजून आठवताहेत. 'मला भारत ह्यासाठीच आवडत नाही कारण ह्या देशात चोरी करणारेच जनतेचे रखवालदार बनून फिरत असतात.' आज माझ्या समोर जिवंत उदाहरण होते.'

रॉनच्या बाईकवर बसल्या बसल्या पोलीस स्टेशनाची ती व्ही.आय.पी रूम आठवताना दोन वर्षानंतरही अंगावर शहारे उभे राहिले. रॉनच्या मनात अजूनही त्या पोलिसांबद्दल राग होता. जेव्हा जेव्हा आम्ही ह्या विषयावर बोलू तेव्हा तो नेहमी सांगे मी एवढा लहानाचा मोठा झालो पण आजपर्यंत माझ्या डॅडींनी कधी माझ्या वर हात उचलला नव्हता पण त्या - - - -ने उचलला. आताही मी रॉनला त्या गोष्टीची आठवण करून दिली तेव्हा रॉन चिडून म्हणाला,

"तुला अचानक नाही त्या गोष्टी कशा आठवतात रे मिंगेल?"

"आज सकाळीच मॉमने तो विषय काढलेला त्यावरून आठवण झाली."

"बरं आहे, मला वाटलं माझ्याच घरात त्यावरून बडबड चालते. दोघी बहिणी सारख्याच. अजून काय म्हणाली मावशी?"

"पिकनिकला पाठवणार नाही असं म्हणाली"

"असं बोलली मावशी, पण कारण काय न पाठवण्यामागचे?"

"ती घाबरते. ती सांगते तुम्ही सगळे एकत्र असले कि काहीना काही लफडी करणार मागच्या वेळेसारखी."

"बरोबर आहे तिचे. एक काम कर, तू येऊ नको."

"असं न डुकरा, मी खरंच येणार नाही."

"नको येऊस, तू कोण मोठा सेलीब्रीटी आहे?"

"बरोबर आहे तुझे, गावातली मुलं असली की तुला मॅकची गरज नसते. आणि आज जरी मी सेलिब्रिटी नसलो तरी कधी न कधी नक्कीच होईन." बोलून मी गप्प बसलो, खूप वेळ झाला मी काही बोलत नाही हे पाहून रॉन म्हणाला,

"साल्या रागावतो काय मुलींसारखा, तुझ्याशिवाय एकटं टॉयलेटला जायला कंटाळा येतो. पिकनिक तर दूरची गोष्ट झाली. मी समजावेन मावशीला."

"तू तर काहीच बोलू नको तिला. नाहीतर कुठे पाठवणार असेल ती पण नाही पाठवायची आणि खुळ्या तू मॉमला काय सांगितले?"

"मी कुठे काय सांगितले?"

"तू तिला सोहाबद्दल सांगितले ना?"

"हो."

"मी तिला सरप्राईज देणार होतो, गाढवा."

"मला काय स्वप्न पडलेले तुला सरप्राईज द्यायचे आहे ते. आणि सर प्राईज तू दिले काय आणि मी दिले काय, काय फरक पडणार आहे त्याने?"

"पडला ना फरक. परवा मॉमचा बर्थडे आहे. मॉमला न सांगता मी सोहाला घरी घेऊन जाणार होतो. पण सगळा प्लान चौपट."

"आयला मस्त आयडिया होती यार. अजूनही आयडिया आहे माझ्याकडे, तुझ्याहूनही चांगली."

"काय?" मी मोठ्या उत्सुकतेने विचारले.

"तू सांगतो ना तुझा प्लान चौपट झाला, आपण तो तिप्पट करू."

"म्हणजे?" मी थोड्या आश्चर्याने विचारले.

"ती आपल्या कॉलेजची टूनटून आहे माहित आहे?"

"कोण ती काळी सांड मलायका?"

"हा. तू तिला घरी घेऊन जा व मॉमला सांग ही सोहा आहे म्हणून. आहे कि नाही तू देणार होता त्याच्या तिप्पट मोठं सरप्राईज?

खरं बघायला गेलं तर नक्कीच मलायका सोहाच्या तीन पट जाडी असेल. ती जाडी होतीच पण दिसायला तर त्याहून खतरनाक. कुठे माझे गुलाबाचे फुल आणि कुठे ते सुर्यफुल. मला कल्पनाच करताना वाईट वाटलं. मनात विचार आला, गळा आवळू कि काय ह्या मुलाचा. निर्लज्जपणाला पण काही तरी हद्द असते. मग मला अचानक कसली तरी आठवण होऊन मी रॉनला म्हणालो,

"परवा आपल्याला कॉलेजला कार घेऊन जायचे आहे, सोहा व ब्रिटनी येतायेत जेवायला."

"माझी गर्लफ्रेंड तुझ्या घरी जेवायला येतेय आणि मला माहीत पण नाही अजून?"

"ते तिला पण माहीत नाही अजून, आज बोलेन मी कॉलेजला."

"जेवणाचे काय करणार आहेस?"

"मॉम बनवेल घरी."

"ठीक आहे पण तिला सांग जास्त काही बनवू नको. बिअर प्यायल्यावर जेवण जात नाही आणि ह्या मुली केवढ्या जेवतात माहीत आहे ना दुसऱ्यांच्या घरी."

"तुला कोणी सांगितले आपण बिअर पिणार?"

"का, तुझ्या मॉमचा बर्थडे आणि तू बिअर नाही आणणार?"

"ओय बाठ्या, सोहा आणि ब्रिटनी असणार आहेत तिकडे."

"असू दे ना, त्यात काय झाले?"

"सोहासमोर मी तरी कधी पिणार नाही, अॅटलीस्ट सोयरिक होईपर्यंत तरी."

"गुड, मी पण तोच विचार केलेला, मी फक्त तुझी परीक्षा बघता होतो." रॉन म्हणाला पण त्याचा नाईलाज होता म्हणूनच. मी त्यावर त्याला उत्तर दिले.

"सांगतात ना कोल्ह्याला द्राक्षं आंबट तसे तुझे झाले आहे."

"आंबट तर आंबट, मी त्या द्राक्षाची वाईन करून पिईन."

हसतच मी कपाळावर हात मारला. पुढे बोलायला माझ्याकडे काही शब्दच उरले नव्हते.

आमचे पिण्याचे वेड हे अगदी लहानपासुनच होते. अगदी पहिली दुसरीत असल्यापासूनच, लहानपणी सणाला फर्नांडीस नेहमी आम्हाला वाईन प्यायला देत असे. त्या वाईनच्या एक ग्लासमध्येच आम्ही दोघे टून होऊन जात. रॉबिनमामा त्यावेळी इथेच जॉब करीत होता. तोही कधी कधी आम्हाला त्यांच्या मित्रांबरोबर बसवून बिअर प्यायला देई. जसे जसे वय वाढत गेले तसे तसे पिण्याचे वेडही. घरातले वातावरण एकदम फ्री असल्याने आम्हाला त्या बाबतीत कधी अडथळा आला नाही. योगायोगाने म्हणा किंवा दुर्दैवाने, आम्हाला जे मित्र भेटले ते सुद्धा आमच्यासारखेच. आम्ही त्यामध्ये काही चुकीचे करतोय ह्या गोष्टीची जाणीव कधी झालीच नाही. ज्यांनी आम्हाला ती जाणीव करून द्यायचा प्रयत्न केला त्यांनाच आम्ही वेड्यात काढले. भले पिण्याचा परिणाम आमच्या शरीरावर होत असला तरी तो जोपर्यंत मनावर होत नाही तोपर्यंत पीत राहायचे असा निर्धारच आम्ही केला होता. नंतर नंतर तर ही आमची लाईफस्टाईलच बनून गेली होती.

**केविन आल्मेडा, नवाळे, निर्मळ**

**श्री. मेलविन डाबरे, सेंट ॲलॉशीयस डी. टी. एड. कॉलेज, पापडी येथे अध्यापकाचार्य आहेत. अनेक लोकगीते, धार्मिकगीते, भावगीते, बालगीते यांच्या सी. डी.चे निर्माते, वसईकर या लग्नगीताच्या सी. डी. चे पाच भाग प्रकाशित केले आहेत तसेच " संगीत" हया विषयावर पुस्तक लिहिले आहे. वेगवेगळ्या एकांकिका, पथनाट्य असे अनेक उपक्रम त्यांचे सतत चालू असतात, पुढील वाटचालीसाठी मेलविन सरांना अनेक शुभेच्छा -- संपादक**

# लोकसंगीत – लोकगीते

**उगम**

लोकसंगीताचा जन्म अतिप्राचीन आहे. मानवी संस्कृतीचा प्रत्यक्ष, ऐतिहासिक व सांस्कृतिक पुरावा म्हणजे लोकसंगीत. माणसाने आपल्या बोलीभाषेत सहजस्फुर्त अशी जी विविध प्रसंगानुरुप गीते रचली व संगीतबध्द केली त्यांना लोकगीते किंवा लोकसंगीत असे म्हणतात. मानवी जीवनाच्या प्रवाहात लोकसंगीत पूर्णपणे एकरुप झालेले आहे.

**लोकगीतांची निर्मिती**

लोकगीत म्हणजे माधुर्यमय कविता की, जी जुन्या काळात वेळ घालविण्यासाठी निरक्षर व साक्षर निनावी लोकांनी अस्तित्वात आणलेली आहे. लोकगीतांची निर्मिती कोणत्याही एका माणसाची असते असे नाही तर त्याच्यावर सामुहिकतेचा पगडा असतो.

**लोकगीतांचे विषय**

सर्वसामान्य लोकांचे जे प्रश्न, जिव्हाळयाचे विषय, विशिष्ट भू-प्रदेश, नैसर्गिक वैशिष्टये, त्यांचा मानवी मनावर होणारा परिणाम, समाजातील विचार, संस्कृती, शिक्षण, सण, उत्सव, चालिरिती, इतिहास, भुगोल, शास्त्रीय व सामाजिक परंपरा, धर्म यासारख्या अनेक गोष्टींचे प्रतिबिंब लोकगीतात दिसून येते. व्यक्तीगत सुखदु:खे, आशा-निराशा, प्रेम-द्वेश, राग-लोभ यांचे चित्रण लोकगीतात शक्यतो होत नाही.

**लोकगीत : मौखिक व संमिश्र परंपरा**

लोकगीत ही एक मौखिक परंपरा आहे. आकर्षक वाटणारे लोकगीत ऐकून ऐकून दुसऱ्या संस्कृती गटाच्या संचापर्यंत पोहचते, त्यात बदल होवून ते आणखी पुढे जाते अशी ही मौखिक परंपरा सुरुच असते.

बऱ्याचदा केवळ निसर्ग लोकसंस्कृती इथपर्यंतच लोकगीते मर्यादित न राहता धार्मिक संस्कार, विवाहादी विधी इत्यादी विषय देखिल लोकगीतात हाताळले जातात म्हणून लोकगीते ही संमिश्र परंपरादेखील आहे.

**लोकगीतांची भाषा**

आपल्या संस्कृतीतील सर्व घटकांना जवळिक वाटेल अशी भाषा लोकगीतांची असते. स्वत:चीच बोलीभाषा असलेले गीत मोजक्या व सरळ स्वरुपात असलेली स्वररचना व ठराविक ताल यामुळे लोकगीताचा प्रचार व लोकप्रियता जास्त झपाटयाने होते.

**लोकगीत : रागसंगीत निर्मितीस पोषक**

मार्गी संगीताच्या प्राचीन कालखंडातही सर्वसामान्य जनतेत लोकगीत अतिशय लोकप्रिय होते. या लोकगीतांतूनच जातीगायन जन्मले व जातीगायनातून रागसंगीताची निर्मिती झाली. विविध प्रदेशातील विविध चालींच्या लोकगीतांमुळे राग निर्मिती करणे सोयीचे झाले. आजच्या शास्त्रीय संगीताच्या सुवर्णकाळातही लोकसंगीताचे स्थान अचल आहे. आजच्या लोकप्रिय असलेल्या चित्रपट संगीतातील गाण्यामधील फार मोठया प्रमाणातील गाण्यांच्या चालीचा आधार लोकगीत आहे.

**लोकगीतातील वाद्ये : घडण, वादन, वापर**

लोकगीतात वापरली जाणारी वाद्ये साध्या बनावटीची व निसर्गत: उपलब्ध असणाऱ्या गोष्टींवर ज्यांची घडण अवलंबून आहे अशी असतात. ही वाद्ये मुख्यत: साथसंगतीची असतात ती स्वतंत्र वाजविण्याची नसतात. ही वाद्ये लयबद्द असतात.

लोकगीतात वाद्यवादनासाठी विशेष शिक्षण घेण्याची आवश्यकता असतेच असे नाही पण कुशलता व विशेष प्राविण्य मिळविणे आवश्यक असते. लोकगीतात सर्वत्र ताल असेलच असे नाही परंतु ताल नसतानाही लयांचे अस्तित्व अपरिहार्यपणे जाणवते.

सर्व लोकवाद्ये सर्व उत्सव वा विधीमध्ये वापरता येत नाहीत. कोणते वाद्य कुठे वाजवायचे व कुणी वाजवायचे याचे काही विधीनिषेध असतात. काही विशिष्ट वाद्ये पुरुषांशी (नरवाद्ये) तर काही विशिष्ट वाद्ये स्त्रियांशी (मादी वाद्ये) संकेताने बध्द असतात.

**लोकवाद्यांचे वर्गीकरण : तीन मुख्य पद्दती**

1. वाद्य मुख्यत: कशाचे बनविले जाते यावर आधारलेली पध्दत
2. संगीत शैलीवर आधारलेली पध्दत
3. ध्वनीशास्त्रीय तत्वावर आधारित पध्दत

**वाद्यांचे वर्ग**

1. कंपितशरीर (इडिओफोन) धनवाद्ये
   उदा. : खुळखुळे, झांज, टाळ, घंटा, काष्ठतरंग, चिपळया, चकवा, घुंगरु
2. कंपितपटल (मेम्ब्रानाफोन) अवबध्द वाद्ये
   उदा.: ड्रम्स, तबला, हलगी, ढोल, ढोलकी, डफ, घुमट, ताशा, नगारा, चौघडा
3. कंपिततंत्री (कॉर्डोफोन) तंतूवाद्ये
   उदा. : तुणतुणे, एकतारी, सारंगी, कोका
4. कंपितवायुस्तंभ (एअरोफोन) सुषिरवाद्ये
   उदा. : शिंग, तुतारी, बासरी, सनई, पुंगी, सुंदरी, मुरली, अलगुज

**लोकगीतांचे प्रकार**

लोकगीतांचे ढोबळमानाने पुढील प्रकार करता येतात.

लौकीक गीते, निसर्गगीते, स्त्रीगीते, क्रीडागीते, श्रमगीते, संस्कारगीते,

अंगाई गीते, ओवी, कार्यगीत, कथागीते, धार्मिक गीते, नृत्यगीते.

**--- मेलवीन जोसेफ डाबरे, सालोली, गिरीज**

प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

15 ऑगस्टच्या दिवशी माझ्या 6 महिन्याच्या गरोदर पत्नीला त्रास होऊन तिची Premature Delivery होऊन आम्हाला मुलगी झाली पण तिचे Internal अवयव "Under-Developed" असल्यामुळे अवघ्या 5 दिवसात आमची मुलगी आम्हाला सोडून गेली, तिच्या आठवणीसाठी लिहिलेली कविता तसेच त्यावेळेच्या आठवणी इथे देत आहे.

## पोरी, तू परत येशील का गं?

पोरी, तू परत येशील का गं?
मम्मा आणि मी तुझी वाट बघतोय गं?
कळीसारखी तू उमळलीस, फुलण्या आधीच विरून गेलीस
भल्या पहाटेच्या वेळी दिवसा काळोख करुन तू निघून गेलीस

मम्मा तुझ्यासाठी देव बाप्पापाशी झगडली
सहा महीने मी तिला उदरात माझ्या वाढवली
अचानक असे तिला का रे बोलावणे आले
तिच्याचसाठी का बरे स्वर्गाचे दार अकाली उघडले

त्या मातेचं उदर आक्रंदन करतय
तू अकाली साथ सोडल्यानं गदगदतय
मनाची तहान बेटा अजून भागली नाहीय
तुझी ती छोटी प्रतिमा डोळयासमोरून अजून सरली नाहीय

कोवळ्या नाजुक हातांची ऊब तुझ्या घ्यायची होती
हाताला धरून माझ्या, तू दुडुदुडू धावणार होती.
पण रखरखलेले हात तुझे हाती होते
चेहऱ्यावरचे क्लेश तुझ्या, मन जाळत होते

तुझा स्पर्श, तुझे ते चिमुकले हात आठवतोय
पाच दिवसांचा तुझा सहवास मनात साठवतोय
अचानक रात्रीची जाग येऊन मी उठतोय
पाणावलेल्या डोळयाच्या कोपऱ्यातून तू शोधतोय

आकाशातील ताऱ्यांत माझी "एंजेल" कुठे असेल
कधीतरी मला ती त्यामध्ये दिसेल

स्वप्ने अनेक पाहिली होती, तुझ्यासाठी माझ्या परीराणी
येशील का परतूनी पोरी, माझ्याच जीवनी

# मेलिंडा – माझी 5 दिवसाची मुलगी – एक अनुभव

15 ऑगस्ट, स्वातंत्र्य दिन, दुपारी जेवण झाल्यानंतर टि.व्ही. वर “ 3 इडियट्स” चित्रपट चालू होता, मी आणि माझी पत्नी, आम्ही दोघं तो बघत बसलो होतो, स्क्रीनवर हीरो, आमीर खान, हिरोईन करीना कपूरच्या गरोदर बहिणीला ‘ऑल इज वेल’ सांगत होता आणि तिच्या उदरातील बाळ तिला “किक” करत होतं, मलाही मग माझ्या 6 महिन्याच्या गरोदर पत्नीची, स्मिताची चेष्टा करावी वाटली, मी तिला म्हणालो,
“मीही तुझ्या पोटावर हात ठेवून ‘ऑल इज वेल’ बोलतो, आपलं बाळ तुला “किक” करतं का बघूया”.
स्मिता म्हणाली, “चेष्टा पुरे झाली, थोडा वेळ वर बेडरूममध्ये जाऊन आराम करू या”.

तिची आज्ञा मानून टि.व्ही ऑफ केला व बेडरूममध्ये आलो, काही वेळाने मला ती उठवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे जाणवले. मी खाडकन जागा झालो. तिचा चेहरा गंभीर दिसत होता,
मी म्हणालो “काय झाले?”,
“पाणी जातयं, चांगलं लक्षण नाहीय” माझी पत्नी म्हणाली, “खाली मम्मीला जाऊन विचार”.

मी मम्मीला विचारले, स्मिताच्या माहेरी फोन करून सासुलाही विचारले, दोघांनीही ताबडतोब डोक्टरांकडे जाण्यास सांगितले. साडेतीन वाजले होते, मी बाइकवर स्मिताला घेऊन डॉक्टर जोगळेकर यांच्या विरार येथील मॅटरनिटी होममध्ये आलो, स्मिताला ताबडतोब “Observation Room” मध्ये नेण्यात आले. साधारण 15-20 मिनिटांनंतर डॉक्टरांनी मला बोलावलं, त्या वेळेला ते जे बोलत होते त्याने आमच्या आयुष्यातील एका अति दु:खद प्रकरणाची सुरुवात झाली होती.

डॉक्टर म्हणाले “ गर्भाशयातील पाणी जात असल्यामुळे “Premature Delivery” करणे भाग आहे. तुमच्यापुढे त्यासाठी दोन ऑप्शन आहेत, एक तर तुम्ही तिला एखाद्या मोठ्या हॉस्पिटल मध्ये जायचे असेल तर जावू शकता पण बाळाचे “Survival Chances” फारफार 5 ते 10 % ने वाढू शकतात, इथेही विरार मध्ये अंकुर हॉस्पिटल मध्ये “Ventilator” व “Incubator” ची व्यवस्था आहे त्याचा तुम्हाला उपयोग करता येईल.

माझे हातपाय कापरू लागले. मी डॉक्टरांना एवढेच म्हणालो की माझ्या स्मिताला त्रास होईल असे काही करू नका पण मी एकटा निर्णय घेणार नाही, मी माझ्या घरच्यांना बोलावतो. फटाफट घरी, स्मिताच्या माहेरी फोन करून आलेल्या संकटाची त्यांना कल्पना दिली व लवकरात लवकर हॉस्पिटलला येण्याची विनंती केली.

घरचे सगळे तिथे जमा झाल्यानंतर मी त्यांना परत एकदा डॉक्टरांनी जे संगितले होते त्याची कल्पना दिली. मुंबईला जाणे येणे फार जिकिरेचे असल्याने आपण जे काय उपचार येणाऱ्या बाळावर करायचे असतील ते इथेच विरारला करूया यावर सगळ्यांचे एकमत झाले. त्यानंतर डॉक्टरांनी सांगितले की माझ्या पत्नीला येत्या 8 ते 10 तासात कळा यायला हव्यात नाहीतर सलाईनमधून इजेंक्शन देऊन डिलीवरीसाठी प्रयत्न करावे लागतील. आम्हीही डॉक्टरांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींना होकार दिला. मी आणि स्मिताची मम्मी रात्री वस्तीला राहिलो.

16 ऑगस्टच्या सकाळी बरोबर 7.30 वाजता डॉक्टर त्यांच्या सकाळच्या " रूटीन व्हिजिट"ला आले, त्यांनी सांगितले की मी सलाइन लावून त्यातून कळा येण्यासाठी इंजेक्शन देणार आहे पण "डिलिव्हरी"साठी आजचा संपूर्ण दिवससुद्धा जाऊ शकतो. दिवस हळूहळू पुढे सरकत होता, संध्याकाळी 4 ते 5 वाजण्याच्या सुमारास परत एकदा ते व्हिजिटला आलेले असता अजून 4 तास लागण्याची शक्यता असल्याचे सांगितले परंतु साधारण तासाभरानंतर म्हणजेच 6:15 वाजता स्मिताला अचानक एक मोठी कळ आली आणि बाळाचे डोके बाहेर आल्याचे तिला जाणवले, तिच्या बाजूला माझी काकी होती. ताबडतोब तिला "Operation Theatre" मध्ये नेण्यात आले. दोन मिनिटातच तिची प्रसूती झाली.

तिला बेडवर आणून डॉक्टरांनी मला आणि माझ्याबरोबर आणखीन दोघे अश्या तिघांना आत "Operation Theatre" मध्ये बोलावले, माझ्याबरोबर माझी सासू आणि काकी या दोघी आल्या, तिथल्या टेबलवर नुकताच जन्मलेली माझी मुलगी होती. संपूर्ण शरीर काळसर दिसत होते, "premature" असल्यामुळे ती फार छोटी दिसत होती. डॉक्टर जोगळेकर यांनी डॉक्टर बारोट यांना तिथे बोलावले होते, ते मला सांगत होते की या बाळाची पूर्ण वाढ न झाल्याने "Ventilator"वर आणि "Incubator" मध्ये ठेवावे लागेल, तुम्हाला मोठ्या खर्चाची तयारी ठेवावी लागेल, तसेच या केसमध्ये काहीही होवू शकते.

माझे लक्ष त्या नवजात बालिकेकडे होते, इतर नवजात अर्भकाप्रमाणे तीही पूर्ण हातपाय हालवित होती, भरपूर केस तिच्या डोक्यावर होते, फक्त ती रडण्याचा प्रयत्न करत होती पण आवाज निघत नव्हता. त्याचवेळी मनात खूणगाठ बांधली, कसेही करून या मुलीला वाचवायचेच. ताबडतोब तिला थर्माकोलच्या पेटीत ठेवले गेले, मी,  डॉक्टर जोगळेकर यांचे असिस्टंट, डॉक्टर प्रसाद व एक नर्स, आम्ही माझ्या त्या छोट्या मुलीला घेऊन डॉक्टर बारोट यांच्या "अंकुर हॉस्पिटल" मध्ये आलो, मुलीला Ventilatorवर ठेवण्यात आले. त्यानंतर डॉक्टर बरोट यांनी मला व माझ्या बरोबर स्मिताचे मम्मी-पप्पा यांना त्यांच्या केबिनमध्ये बोलावले, उपचार चालू केले आहेत पण मुलीचे फुफ्फुस व लिव्हर "under developed" आहे आणि पुर्णपणे बाळ वाचेल की नाही याची शाश्वती मी देत नाही असे सांगितले.

त्या पहिल्या रात्री मी वस्तीला होतो, डॉक्टरांनी बरोबर 1-30 वाजता मला येऊन सांगितले की पहिल्या इंजेक्शनचा काहीही प्रभाव न पडल्यामुळे आता 16 हजाराचे दुसरे इंजेक्शन मी देत आहे, त्यानंतर त्या रात्री दोन वेळा रक्ताचे "सिरींग्ज्स" देऊन ब्लड टेस्ट करायला सांगितली गेली, त्या एकदम छोट्या जिवाच्या अंगातून काढलेल्या रक्ताच्या सिरींग्ज्स बघून काळीज तुटत होते. उपचारांचा भडिमार सुरू केला गेला होता, फायदा कितपत होईल? ही शंकाच होती. पण आशा फार चिवट असते. आपले प्रयत्न आपण करावयाचे असतात.

दुसऱ्या दिवशी मी अंकुर हॉस्पिटलमधून जोगळेकर यांच्या हॉस्पिटलमध्ये, स्मिताकडे आलो, साधारण 10.30 च्या सुमारास माझे तात्या-काकी यांच्या बरोबर आमच्या चर्चचे प्रमुख धर्मगुरू, फा. ज्यो. डिमेलो हे आम्हाला भेटायला आले. मुलीला बाप्तिस्मा द्यावा असे मत त्यांनी थोड्या वेळानंतर मांडले, आम्ही दोघांनी त्यास होकार दिला. मग आमच्या भेटीसाठी आलेल्या माझ्या बहीण-भावजीला त्यांनी मदरीन-पदरीन म्हणून हजर राहण्यास सांगितले, आम्ही सगळे जन अंकुर हॉस्पिटलमध्ये आलो, फादरांनी डॉक्टरांकडे जाऊन तशी परवानगी मागितली व ते मुलीकडे जाऊन आशीर्वाद देऊन आले, माझी मनस्थिती ठीक नव्हती म्हणून फादरांनी जेव्हा नावाविषयी विचारले तेव्हा मी माझ्या बाबांना नाव सुचवण्यास सांगितले, बाबांनी "मेलिंडा" हे नाव सुचवले, बाप्तिस्माविधीची प्रार्थना फादरांनी आमच्या समवेत केली. त्या दिवशी डॉक्टरांनी ती उपचारांना प्रतिसाद देत आहे अशी अपडेट दिली. ती रात्र सुद्धा व्यवस्थित पार पडली.

शनिवारी सकाळी माझ्या डोळ्यांना त्रास झाला असल्यामुळे चुलत भाऊ स्वप्नील माझ्या बाबांना घेऊन हॉस्पिटलमध्ये गेला, दुपारी स्वप्नीलचा फोन आला, त्या छोट्या जिवाच्या फुफ्फुसातून रक्त वाहत होते आणि वजन कमी झाले आहे, आणि उपचाराला ती प्रतिसाद देत नाहीय असे अपडेट डॉक्टरांकडून मिळाले असल्याचे त्याने मला सांगितले आणि डोक्टरांनी संध्याकाळी भेटायला बोलवले आहे असेही सांगितले. संध्याकाळी डॉक्टरांनी विझिटच्या वेळेला 'तुम्ही मनाची तयारी ठेवा' कारण ब्लीडिंग चालूच आहे तसेच जे वजन जन्माच्या वेळी 810 ग्रॅम होते ते कमी होऊन 750 वर आले आहे असे सांगितले, माझे मोठे भावजी, पायस त्या रात्री वस्तीला होते, पण एकही वेळा त्यांना ब्लड टेस्टसाठी वगैरे बाहेर जावे लागले नाही.

दुसऱ्या दिवशी, रविवारी सकाळी मी आणि माझे बाबा पूर्ण दिवसासाठी गेलो, परत एकदा डोक्टरानी आम्हाला त्यांच्या केबिन मध्ये बोलावले, त्यांनी आम्हाला पुन्हा कालचीच अपडेट परत सांगितली आणि त्यानंतर आम्हा दोघांकडून "consent" वर सह्या घेतल्या, त्या वेळेपासून मनात विचारांचे थैमान उठले की आपण इतके प्रयत्न करूनही छोटासा जीव यातून सहीसलामत बाहेर येण्यास असमर्थ आहे.

त्या रात्री आम्ही दोघे घरी आलो, माझे दुसरे भावजी वस्तीला होते, दुसऱ्या दिवशी, सोमवारी सकाळी बरोबर 6-00 वाजता त्यांचा फोन आला, आणि ती अशुभ बातमी माझ्या कानावर पडली, आमची मुलगी अवघ्या पाच दिवसाचे आयुष्य जगून आल्या पावली परमेश्वर पित्याकडे परत गेली होती. नकळत डोळ्यातून आसवे गळू लागली. मी आई आणि बाबांना ही बातमी दिली आणि आम्ही ताबडतोब हॉस्पिटलला जायला निघालो. भावजींनी सगळी व्यवस्था अगोदरच करून ठेवल्यामुळे 15 मिनिटात आम्ही तिचे कलेवर घेऊन निघालो, माझ्या बायकोने तिला पाहिलेले नसल्यामुळे तिच्या माहेरी तिला दाखवून परस्पर चर्चवर दफन करण्यासाठी न्यायचे असे आम्ही ठरवले परंतु हॉस्पिटल मध्ये तिला फादरांनी बाप्तिस्मा दिलेला असल्यामुळे चर्चवर आणल्यानंतर मिस्सासकट सगळे अंत्यसंस्कार तिला मिळाले.

आजही तिचा फोटो पाहिला की डोळ्यात अश्रु गर्दी करतात, खंत फक्त एकाच गोष्टीची वाटते की तिला आम्ही वाचवू शकलो नाही, आणखी एक मागणे परमेश्वरापाशी की अश्या ह्या छोट्या जिवांना जे हाल सहन करावे लागतात ते लागू नयेत.

खिस्तोफर रिबेलो, चौकाळा

**सबिना फोस यांना शब्दांची फुले रचण्याची एक अमूल्य अशी देणगी लाभली आहे, आतापर्यंत त्यांचे "कळत-नकळत" व "आता पुन्हा एकदा" हे कविता संग्रह व "सुगंधी क्षण" हा चारोळी संग्रह प्रकाशित झाला आहे, त्यांची काव्य संपदा अशीच वाढत राहावी अश्या प्रार्थनामय शुभेच्छा. – संपादक**

# चारोळया

मी हात लांबवला तेव्हा
कुणीच धरला नव्हता
मग आता कसे म्हणतात सारे ?
'वेड्या एकटाच कुठे निघालास?'

***

हवे असणे व न मिळणे
हे तसे नित्याचेच आहे
गरज ओळखून मागणे
हे शिक्षण नवीन आहे .

***

ह्या उन्हाची तऱ्हा निराळी
चटके नि निखारे मनात सारी
बाहेरून मात्र सोनसळी देखणी पिवळाई
कित्येक जीवांची हीच कहाणी

***

दु:खावरचं औषध
कुणाचं कुणाला लागू होत नसतं
आपण आपला आनंदाचा मार्ग
आपल्या आतच शोधायचा असतो .

***

काय कारण घडलं असावं ?
मेघ अवेळी का गाळतायत आसवे ?
देवा तुझे नाही आमचेच काही चुकले असावे
वैराण धरतीचे मूख लवकरच सुकले असावे .

***

ओंझळभर घेऊन फुले
देवाच्या पायावर ठेवली
देवाने तेव्हां विचारले
कोणाच्या बागेतून चोरली

***

कधी कपाटातही असतं नेटवर्क
कधी खिडकीजवळही असत नाही
कुठे थोड्याच अवधीत जीव जडतो
कुठे वर्षोनवर्षे एक दार पुढल्या दाराला ओळखत नाही

**----- कु. सबिना फोस.**

**(गास)**

इग्नेशियस डायस हे एक प्रतिभावान कवी आहेत, साहित्य अकादमी आयोजित 'मुलाकात' या कार्यक्रमात २०१० साली त्यांना कविता वाचन करण्याची संधी प्राप्त झाली होती तसेच अभिधानंतर- मुंबई, खेळ - पुणे, दर्शनसावंतवाडी -, ववसई -, अनुष्टुभ - नाशिक, जनसंघर्ष- वसई इत्यादी आघाडीच्या नियतकालीकांमध्ये सातत्याने त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. लवकरच त्यांना प्रथितयश कवींच्या पंक्तीत स्थान मिळो ही सदिच्छा. त्यांच्या तीन कविता इथे उधृत होत आहेत. – संपादक

## 1. सांस्कृतिक पलंगातील शिघ्रचरीत्रपतन

शहर माझ्या घरात हॉलमध्ये

रेलून बसलेलंय सोफ्यात

मेंदूमध्ये मुद्देसूदपणे मुळावलेलं

अत्याधुनिक झाड फ्यूचरीस्ट

मी आहे त्यापेक्षा

कितीतरी काळ पुढे सरकलेलं

शहर हलवतं मान

सोबत हलते त्याच्या तल्लख मेंदूतलं

सतत सळसळणारं सुपरफास्ट झाड

माझ्या अडाणी अंगणात

उथळ फळांचा खचंच खच

एक फळ उचलतो मी

ॲपल ॲपल म्हणत

व घेतो कचकन चावा

उथळपणात रूतते माझी

गावठी दाढ विव्हळते

शहराचं सिंपथेटीक स्मितहास्य हलकेच

माझ्या खरखरीत कातडीवर क्रिमसारखं पसरतं

किती मुलायम होत जाते त्वचा माझी

नेमकी तेव्हाच एक आत्यंतीक असभ्य खाज

खराखरा डिस्टर्ब करते शहराला

रोखून बघतं शहर

माझ्या मागासलेल्या डोळ्यात खोलवर

त्याच्या एका डोळ्यातून भिडते नजर

कपटी करूणेने ओथंबलेली

माझं भोळं अर्धांग लोळागोळा होऊन

शहराला शरणागत

त्याच्या दुसरया डोळ्यांतून ओसंडणाऱ्या

उत्तुंग फापटपसाऱ्यासमोर

माझं उर्वरीत अंग

भणंग

# 2. शक्यताशक्यतांच्या शक्यता आणि अशक्यता

### अ.

शक्यतांचे

फ्लोअर

एकावर

एक

रचून

उभारतोय

स्वप्नांचा

गगनचुंबी

कलता

टॉँवर

अशक्यतेच्या

काँक्रटी

पायावर

मजबूत

### ब.

स्वप्नांच्या

कलत्या

टॉँवरला

लोंबतोय

अधांतरी

आधार

सोडून

अशक्यतेच्या

जमिनीचा.

टॉवरच्या

ग्लासीक

गळ्याला

मारून

गच्च मिठी

शक्यतेची...

### क.

स्वप्नांच्या

नागमोडी

रस्त्यावर

तुडवत

चिखल

शक्यतांचा

अशक्यतांच्या

घनदाट

जंगलात

किरकीर

मनाची

डबलढोलकी

बडवत

तुडवत

स्वप्नांची

नागमोडी

वाट

*** इग्नेशियस डायस, भुईगाव

**एडवर्ड डिसोजा हे एक नव कवी परंतु त्यांच्या कवितांचा दर्जा अतिशय उच्च प्रतीचा आहे, वयाच्या 10व्या वर्षी लिहिलेली पहिलीच कविता “ सुवार्ता” या अग्रणी मासिकातून प्रकाशित झाली होती, कुठल्याही विषयाला हात घालून त्यावर कविता करण्याचे कसब त्यांना लाभले आहे हे त्यांच्या कवितांवरून समजेलचं, लवकरच त्यांच्या कवितांचा संग्रह पुस्तक रूपाने वाचकांच्या भेटीसाठी येत आहे, त्यांना पुढील उज्वल साहित्यिक भविष्यासाठी खास खास शुभेच्छा**

## "धुंदीत होतो मी"

आपल्याच लयीत जात होतो संथपणे…
इतक्यात भुर्रकन निघून गेला
एक,
मग, आणखी एक
झपाझप ...
सारेच चालले, जातायत मग,
आपणच मागे का ..
..... हाच विचार
आपोआप फिरलं अक्सेलेटर
लक्षच दिले नाही काट्यावर ...
समुद्र खवळला कानाशी ..
वारा सुई होवून डोळ्यांना टोचत होता..
….पुढे गेलेले सारेच मागे पडले
मला कोण हरवू शकतो...
पोचलो ना सगळ्यात आधी
खूप बरं - आनंदी वाटलं...
....मागे वळून पाहिले
कोणीच दिसले नाही...
अरे ! असे कसे होईल ..
कोणीच कसे दिसत नाही...
एव्हाना पोहोचायला पाहिजे होते ..
आजू - बाजूलाही कोणीच दिसत नव्हते ..
रस्ता चुकलो नव्हतो ना... प्रश्न ..
फिरलो मागे आल्या रस्त्याने ..
कोणीच दिसेना ...
अरेच्या ! असे काय झाले.. कुठे गेले सारे ..

.... दिसला घोळका माणसाचा लांबून ..
हायसं वाटलं ..
कुजबुज त्यांची आपापसातली ....
काहीतरी भयंकर घडल्याचे भाव चेहऱ्यावर ..
साऱ्यांच्याच..
एक - दोघांना विचारलेही ...
पण काही ऐकलेच नाही
या अविर्भावात ते आपल्यातच गुंतलेले ...
... मीच पुढे होवून पहिले ...
रक्ताचा सडा, पिचकारीही उडालेली बाजूच्या भिंतीवर ...
गाडी एक चाकी कि दुचाकी कळलेच नाही...
पाहवल नाही... अंधारी आली डोळ्यांसमोर ...
बाजूला झालो ..
"काय ठावूक नक्की काय झालं..!"
"रस्ता एकदम खाली होता..."
"आवाज ऐकून आम्ही बाहेर आलो ..."
"शक्यता कमी आहे...!"
"त्या तिथे शेजारच्या ओटीवर नेलंय..."
कोणाचेतरी शब्द आले कानावर...
गेलो तिथे ...
कोणी हॉस्पिटलला फोन करीत होता...
तर कोणी इतरांना बोलावीत होता...
कोणी घडलेलं सांगत होता...
जमलेल्यातील बायकांचे डोळे लाल बुंद ...

कोणाच्या तरी रडण्याचा आवाज ...

नक्कीच काही तरी विपरीत घडल होतं...

जवळ गेलो ...

जमीनच सरकली पायाखालची...

रडणारा आवाज आणि चेहरा माझा आप्तच होता .. नि

मी समोर असूनही अनोळखी झालेलो...

विजयी होवूनही मी पराभूत झालेलो

माझ्याच प्रेतासमोर ...

## खिळा

तुझं अस्तित्व ते केवढं

तरी

काही नवीन आले तर आधी तुझा शोध..

काही लटकवायचे तर तुझा विचार

जुन्या सामानाच्या पेटीत, टेबलाच्या खणात, सामानाच्या पिशवीत

तुझं अस्तित्व...

आमच्याच फायद्यासाठी तुझा वापर

तरीही तुझ्या डोक्यावर घाव हातोड्याचे

स्वतःसाठी दुसर्याची डोकी फोडणारी आम्ही

कसे कळणार तुझं दुःख..

तुझ्या सरळ पण टोकदार स्वभावाने

सहज शक्य होतं कुठेही प्रवेश करणं

आम्हीच अडकून जातो

आमच्या टोकाच्या भूमिकेत

कित्येकदा...

तुझ्या सरळ नि टोकदारपणामुळेच

तू कधीच कुणापुढे वाकला नाहीस

तोही अगदी तसाच

म्हणूनच,

भाग्य तुझ्या नशिबी

अतिपवित्र हातापायांना स्पर्श करण्याचे / चुंबन घेण्याचे

एक अनामिक ओढ तेव्हापासून तुझ्यात

हातापायांना चुम्भण्याची

नको लागुस आजच्या पापी, भ्रष्ट

हातापायांच्या नादी

तुझा सरळ टोकदारपणा

वाकवून बोथट करतील...

वर

तूच कलंकित होशील

# माय...

डोकी टोपुलं माय निघाली शेतामधी

गाडं संसाराचं तिने हाकललं एकहाती

न पहिली राबताना सकाळ, दुपार, संध्याकाळ

मनी विचार, मोठं करायचंय मला माझं बाळ....

न भ्याली ती ऊन, पाऊस, थंडी ह्यांना

खूप कष्ट पडले पण सांभाळून घेतले सर्वांना

माय माझी मोठ्या दयेची, मायेची

दोन घास सर्वांना वाढून स्वतः राहिली उपाशी

स्वतःचं दुखणं तिने अंगावरच काढली

माझ्या साध्या सर्दी-खोकल्याला रात्र-रात्र जागली

बिकट परिस्थितीत जवळची सारी दूर झाली

प्रार्थनेची जोड नि स्व विश्वासाने ती तारून गेली

झाली मुले शिकून मोठी कमावती

माई वाटले कष्टाचे दिवस आता लवकरच सरती

आली घरी मोठ्या घरची सून

माय करी तिचे लाड आनंदाने राबून

राब-राब राबती दिवसभर सांजेला माय थकून जाती

छोट्या चुकांसाठी प्रसंगी मार शब्दांचा खाती

एक दिवस बांधलं मुलाने स्वतःचं नवं अलग घरटं

सारी स्वप्ने गळून मायेच्या नशिबी आले पुन्हा कष्ट

मुलाचा अलग संसार, तरी माय राहती खुश

तिच्या कष्टाचं झालं होतं चीज

आपल्या दुःखाची माय तक्रार ना करती

"आलिया भोगासी" म्हणत एकटीच संसाराचं गाडा हाकती

डोकी टोपुलं माय निघाली शेतामधी

गाडं संसाराचं तिने हाकललं एकहाती...

-

**-- एडवर्ड डिसोझा , वाघोली**

**राजन डिमेलो एक नवकवी, वसईच्या सामवेदी बोलीभाषा "कादोडी" मध्ये दर्जेदार अश्या कविता-कथा लिहिण्यात अग्रगणी, त्यांनी साहित्याच्या प्रांगणात लावलेल्या या रोपट्याचे डेरेदार वृक्षात रूपांतर व्हावे अशी त्यांना शुभेच्छा - संपादक**

# बायबल वाचन

वाचन, म्हणजे बायबल वाचन, नव्हे नुसतंच वाचन,

ते आहे त्या सर्व शक्तिमान ईश्वराचे सर्वसमर्थ वचन,

शब्दा-शब्दांचे व्हावे त्याचे मनन,

देहबोलीतून प्रकटावे त्याचे चिंतन ॥

दु:ख-कष्टाच्या, भयंकर क्लेषाच्या,

सुवार्ता आहेत त्या, परम पित्याच्या,

निस्सीम प्रेमाच्या, अनंत त्यागाच्या,

सुवार्ता आहेत त्या, निष्कलंक मरियेच्या ॥

मनी देती अपूल्या ते, अविचल सामर्थ्य

जीवना देती अपूल्या ते, परिपूर्ण अर्थ,

करिती असे अपूल्या ते, आयुष्यास सार्थ ॥

बायबल वाचन म्हणजे, श्रद्धा बांधणी

करिती अपूल्या मनी, ते अध्यात्माची पेरणी

देती भंगलेल्या हृदयास, ते विश्वासाची जोडणी

देवाचा संवाद मनुजसी, ते बायबल वाचन,

मनुज बोले ईश्वरासी, ते प्रार्थना-मनन-चिंतन,

सुंदर हे मिलानच्या संत अंब्रोजचे वचन...॥

**राजन डिमेलों, आगाशी**

जॉनसन लोपीस हे एक नवे उभरते कवी आहेत, त्यांच्या स्वत:च्या कवितांचे ई-बूक प्रकाशनासाठी तयार होत आहे. त्यामधीलच तीन कविता येथे सादर केलेल्या आहेत त्यांना भावी साहित्यिक वाटचालीसाठी अनेक शुभेच्छा – संपादक

## १) शब्द

शब्द असतात आनंदाचे..
शब्द असतात दुःखाचे..
आपल्या भावना वक्त करणारे..!

शब्द असतात प्रेमाचे..
शब्द असतात तिरस्काराचे..
आपले हृद्य खोलणारे..!

शब्द असतात मनाचे..
शब्द असतात जिभेचे..
क्षणात परिस्थिती बदलणारे..!

शब्द असतात कवीचे..
शब्द असतात लेखकाचे..
शब्दातून नव्या शब्दाला उलगडणारे..!

शब्द असतात आईचे..
शब्द असतात बापाचे..
नेहमी मार्ग दाखवणारे..!

शब्द असतात माझे..
शब्द असतात तुझे..
एक नवीन नाते जुळवणारे..!

## २) प्रेमाचा अर्थ

प्रेम
काय असते हे प्रेम?
नकळत होणारे ते प्रेम..
आयुष्यात आनंद आणणारे ते प्रेम..
दुखात सुद्धा हसवणारे ते प्रेम..
आनंदात रडवणारे ते प्रेमच..!!

जीवनात ध्येय देणारे ते प्रेम..
ध्येय गाठताना धीर देणारे ते प्रेम..
खचलेल्या मनाला सावरणारे ते प्रेम..
चांगला मार्ग दाखवणारे सुद्धा ते प्रेमच..!!

चांगल्या वाईट आठवणी देणारे ते प्रेम..
आठवणी देवून जीवन जगवणारे ते प्रेम..
अंधारात सोबती देणारे ते प्रेम..
सोबती असून एकटे करणारे ते प्रेमच..!!

चाफ्याचा सुगंध उधळणारे ते प्रेम..
सुगंधात दिवस घालवणारे ते प्रेम..
वाईटापासून दूर नेणारे ते प्रेम..
दूर नेवून पण चांगले भाव देणारे ते प्रेमच..!!

आईचे मुलावर असलेले ते प्रेम..
गाईचे वासरावर असलेले ते प्रेम..

काहीही न मागणारे ते प्रेम..

सर्व काही देणारे पण ते प्रेमच..!!

प्रेम खरच ते प्रेम..
अमूल्य ठेवा असलेले ते प्रेम.. कधीही न

विसरणारे ते प्रेम..
निरागस जीवाला शांती देणारे ते प्रेमच..!!

## ३) पुन्हा भेट

गजबजलेल्या रस्त्यात पुन्हा
ती दिसली होती..
माझ्या विझलेल्या प्रेमाला
आगीची जणू फुंकर होती..

तिचे ते डोळे, जणू माझ्या
प्रत्येक आठवणींची झलक होती..
तिचे ते हसणे, जणू माझ्या मनाला
दिलेली हळूच साद होती...

तिचे ते लाजणे, जणू माझ्या प्रेमाला
तिने दिलेला होकार होता..

तिचे ते गुलाबी गाल आणि त्या वरील खळी,
जणू नव्या प्रेमाची सुरवात होती..
आणि शेवटी गर्दीत अदृश्य होणे, म्हणजे
पुन्हा भेटण्याची ती खुण होती...

-

-- **जॉनसन लोपीस, पडई, नंदाखाल**

## 1) "Virtual World"

हे प्रभू ख्रिस्ता,
तुला माझी 'Friend Request' मिळाली का रे ?
कारण त्याशिवाय आम्हाला पर्याय नाहीय
Facebook, Twitter पलीकडचे जग आम्हाला माहीतच नाहीय
"You Tube" व्हिडिओशिवाय दूसरा ""Source" च नाहीय
रात्रीच्या रात्री त्यात व्यतीत करतोय
अजूनही "Online" आहे, हे गर्वाने सांगतोय

तुझे डोंगरावरील प्रवचन ऐकायला वेळ नाहीय
तुझ्या मागे यायलाही फुरसत नाहीय
आणि तुला आराधिताना आम्ही पेंगुळतोय

तू असे का नाही करत
Facebook, Twitter आणि इतर
Social Networking जॉइन कर,
आम्ही तुला तेथेच भेटतो
बसल्या जागी आम्ही तुला "Follow" करतो
आणि वेळच्या वेळी "Status Update" करतो

तुझे राज्य या जगाचे नाही
आणि आम्हीही या जगाचे नाही
तू स्वर्गी चढलास अन
आम्ही "Virtual World" जगतोय.

# चारोळया

1) पालीचा आसरा होता कुडाची भिंत
काळाची पावलं उलटी फिरली
भक्ष्य शोधण्या, अस्तित्व आपले शाबूत ठेवण्या
ती ही मग कॉंक्रीट भिंतीच्या आडोशाला लपेटली.

2) ओसरीतला झोका काळाच्या पडद्याआड गेला
वरच्या गॅलेरीत झुलतायेत ''फॉरेन''चे झुले
आमराईत झाडं, पण कुंपण म्हणून
कोंक्रिटचा विळखा अन आमराईचा नाही मागमूस

3) कुडाला लेप होता सारवलेल्या शेणाचा
कोंक्रीटच्या भिंती मार्बलने लेपलेल्या
खुले मन, कुडातून आत डोकावणेही होत नव्हते
आता प्रायवसी हवी, कुंपणाने झाकले बंगले

4) कुडाच्या शेणाचा नाही आला कधी दर्प
न त्याला टांगलेल्या दिव्याच्या घासलेटचा वास
एसीची कोंदट हवा, पीओपीचा गरम फुत्कार
सवयीचा झालाय त्या ''सीएफएल'' चा प्रकाश